# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## सोनम वांगचुकांची प्रकृती खालावली, उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष; दिल्ली हायकोर्टाकडून सरकारला नोटीस

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- थ्री इडियट चित्रपटात आमीर खानने ज्यांची भूमिका साकारली ते सोनम वांगचुक थ्री इडियट चित्रपटाच्या माध्यमातून देशाच्या घराघरात पोहोचले आहेत. तर, रॅमन मॅगसेसे पुरस्कार पटकावल्याने त्यांचं कार्य देखील देशाला परिचीत आहे. मात्र, देशात झालेल्या नीट पेपर फुटीच्या घटनेविरोधात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सध्या दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर त्यांचं आमरण उपोषण सुरू आहे. गेल्या १८ दिवसांपासून त्यांनी अन्नत्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. गेल्या १८ दिवसात त्याचं वजन ८ किलोहून अधिक कमी झालं आहे. मात्र, सरकारने अद्याप कुठलीही दखल न घेतल्याने आता हे आंदोलन थेट कोर्टात पोहोचलं आहे.

सोनम वांगचूक यांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त करत ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनीही सोनम वांगचूक यांना फोन करुन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. तसेच, अनेकांकडून वांगचूक यांच्या प्रकतीची काळजी व्यक्त करत उपोषण मागे घेण्याची विनंती केली जात आहे. तर, दिल्लीतील वकील राकेश कुमार सैनी यांनी वांगचूक यांनी उपोषण सोडावं म्हणून जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेत वांगचुक यांचा जीव वाचवण्यासाठी सरकारकडून तातडीनं दखल घेण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. आता, न्यायालयाने याचिकेवर सुनावणी करताना केंद्र सरकारला नोटस बजावली आहे.


(वर्ष ६५ वे अंक १८१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.१६ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# शेतकऱ्यांची ४८ हजार कोटींची जुनी विज बिले माफ करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिल्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बळीराजासाठी आणखी एक मोठी घोषणा केली आहे. त्यांनी साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या शेतीमधील वीज जोडणीची जुनी बिलं माफ करण्याची घोषणा केली.

शेतीला पाणी देण्यासाठी साडेसात हॉर्स पॉवरचे जे मोटारपंप वापरले जातात त्यांना सध्या बिल येत नाही. मात्र, यापूर्वीची जुनी बिलं अजूनही प्रत्येकाच्या नावाने खात्यात जमा आहेत. त्याची वसूली कधीही होऊ शकते. त्यामुळे शेतकरी दुसरं कुठलंही कनेक्शन घ्यायला गेला तर त्याला ते मिळत नाही. मात्र, आमच्या सरकारने निर्णय घ्यायचं ठरवलं आहे की, साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतचं जे जुनं बिल आहे. ४८ हजार कोटी रुपयांचं जुनं बिल वसुल करायचं आहे ते ४८ हजार कोटी रुपयांची जुनं बिल आम्ही माफ करणार आहोत. शेतकऱ्याची पाटी कोरी झाली पाहिजे आणि नव्याने त्याला पाटीवर इतिहास लिहता आला पाहिजे, यादृष्टीने आम्ही हा निर्णय घेतला असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत केली. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केल्याबद्दल भाजपा किसान मोर्चातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. त्या कार्यक्रमात कर्जमाफीबाबत



तपशीलवार माहिती दिल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली.

आज खरं म्हणजे शेती क्षेत्रातली गुंतवणूक आपण वाढवली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मिळून आपण जो पैसा देतो आहे तो ९५ हजार कोटी रुपये आहे. हा निधी कर्ज माफीच्या व्यतिरिक्त हा निधी आहे. शेती क्षेत्रात आपण एआयचा वापर सुरु केला आहे. आपल्याला उत्पादन खर्च कमी करायचा आहे. इस्रायलची शेती पाहिली तर तिकडे फर्टिगेशन आहे. ठिबक सिंचन आहे पण पूर्ण ऑटो आहे. जेवढं सीसी गेलं पाहिजे तेवढंच जातं. त्यामुळे जमीन चांगली राहते आणि खर्च कमी होतो. अशा पद्धतीचे विषय आपल्याला आणावे लागतील असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. रासायनिक खतांमुळे शेतीची अवस्था वाईट होते आहे हे चित्रही आपल्याला बदलायचं आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आज घडीला राज्यातील ७६ टक्के शेतकऱ्यांना आपण दिवसा वीज देत आहोत. या वर्षाअखेर आपला प्रयत्न आहे की, आपण १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्याचा प्रयत्न करु, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मी आयुष्यात खूप कमी सत्कार स्वीकारतो. सत्कारांपासून दूर राहतो. पण किसान मोर्चाने जेव्हा सत्कार करणार आहोत हे सांगितलं तेव्हा मला यात संधी दिसली की या निमित्ताने महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांशी संवाद करता येईल. दोन गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहचवता येतील म्हणून मी सत्कार स्वीकारला. मुंबईला हा कार्यक्रम घ्यायचा आहे असं त्यांनी मला सांगितलं. मी त्यांना म्हटलं की तुमच्या विभागात घ्या. पण मला हे सांगण्यात आलं की मुंबई राज्याची राजधानी आहे आम्हाला तिथेच येऊन तुमचा सत्कार स्वीकारायचा आहे. मी दोन्ही उपमुख्यमंत्री म्हणजेच एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या वतीने आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या वतीने हा सत्कार मी स्वीकारतो असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## आठवडाभराच्या विश्रांतीनंतर वरुणराजा बरसला; जोरदार पावसाची अद्यापही प्रतिक्षा

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- आठवडाभराच्या विश्रांतीनंतर राज्याच्या काही भागात पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली आहे. यामुळं काही प्रमाणत शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तर दुसरीकडे अनेक भागात पाऊसच न पडल्यामुळं शेतकरी चिंतेत आहे. परभणी, बीड, रायगड या जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली आहे. खरीपाच्या पेरण्यांसाठी हा पाऊस दिलासादायक मानला जात आहे. तर ज्या शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत, त्यांच्यासाठी देखील हा पाऊस समाधानकारक मानला जात आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागात बुधवारी सायंकाळी आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने हजेरी लावली. दिवसभर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला असला तरी शेतकऱ्यांना अजुनही जोरदार पावसाची प्रतिक्षा लागून आहे. अद्यापही मोठा पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या विहीरींना तसेच पाणवठे क्षेत्रात पाणी साचले नसल्याचे चित्र आहे.

खरीप पिकांसाठी पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. हा पाऊस खरीप पिकांसाठी लाभदायक ठरणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. हवामान विभागाने पुढील काही दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

परभणी जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. अनेक दिवसांच्या उघडीपीनंतर पाऊस आला आहे. पावसाने सर्वसामान्यांना दिलासा मात्र शेतकरी अद्याप मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरासह परिसरात अखेर पावसाने हजेरी लावली आहे. अनेक दिवसांच्या उघडीपीनंतर झालेल्या या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून सर्वसामान्य नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र हा पाऊस तुरळक आणि कमी प्रमाणात झाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. आज दुपारनंतर ढग दाटून आले आणि काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले, वातावरण प्रसन्न झाले आणि नागरिकांनीही दिलासा व्यक्त केला. मात्र शेतीच्या दृष्टीने हा पाऊस अद्याप अपुरा असल्याचे चित्र आहे.

बीडच्या केज शहरासह परिसरात गेल्या दोन तासांपासून (पान ४ वर)

## मंत्रिमंडळ विस्तारावर नव्हे विकासकामांवर चर्चा, अमित शहांच्या भेटीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा मोठा खुलासा

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून शिंदेसेनेत (शिवसेना) दाखल झालेल्या ६ खासदारांसह राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या सदिच्छा भेटीनंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत त्या ५० मिनिटांच्या मॅरेथॉन बैठकीची इनसाईड स्टोरी सांगितली. यावेळी त्यांनी मंत्रिमंडळ विस्तार, महिला आरक्षण आणि खासदार संजय राऊत यांच्या टीकेवर अत्यंत सडेतोड उत्तरे दिली.

नुकतेच ठाकरे गटाचे ६ खासदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील झाले आहेत. या प्रवेशानंतर, आगामी पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर शिंदे आणि या ६ खासदारांनी घेतलेली अमित शहा यांची भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार आणि आगामी राजकीय रणनीतीवर चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. याच सर्व पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.

अमित शहा यांच्यासोबतच्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे (पान ४ वर)

## अमेरिका-इराण यांच्यातील हल्ले-प्रतिहल्ले सुरुच

तेहरान दि.१५ (वृत्तसंस्था)- अमेरिकेने मंगळवारी रात्री सलग चौथ्या दिवशी इराणवर हल्ले केले. अमेरिकेच्या 'सेंट्रल कमांड'ने दिलेल्या माहितीनुसार, तब्बल ७ तास चाललेल्या या मोहिमेत 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'च्या परिसरातील इराणची क्षेपणास्त्र व ड्रोन केंद्रे, नौदलाची माल मत्ता आणि किनारपट्टीवरील संरक्षण यंत्रणांना लक्ष्य करण्यात आले.

दुसरीकडे, इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'ने बहरीन, कुवेत आणि जॉर्डन येथील अमेरिकन लष्करी तळांवर प्रत्युत्तरादाखल हल्ले केल्याचा दावा केला. तसेच, बहरीनमधील अमेरिकेच्या 'फिफ्थ फ्लीट'चा तळ आणि जॉर्डनमधील 'अझराक' हवाई तळ यांनाही लक्ष्य केल्याचे आयआरसीसीने म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला की, तेहराननने करारासाठी पुढाकार घेतला नाही, तर पुढील आठवड्यात वीज प्रकल्प आणि पुलांनाही लक्ष्य केले जाईल. दुसरीकडे, अमेरिकेच्या दबावापुढे न झुकता 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'बाबतचे आपले धोरण कायम ठेवणार असल्याचे इराणने स्पष्ट केले आहे. इराणच्या आरोग्य मंत्रालयाने दावा केला आहे की, अमेरिकेच्या (पान ४ वर)

### होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांवर इराणचा हल्ला, पुण्यातील इंजिनिअरचा मृत्यू

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- अमेरिका-इराण युद्धाचा जगातील अनेक देशांना फटका बसला आहे. या दोन्ही देशांनी ऐकमेकांवर हल्ला सुरु केल्यानं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अशातच होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने दोन युएईच्या जहाजांवर हल्ला केला आहे. या हल्ल्यामध्ये एका भारतीयाचा मृत्यू झाला, तर १० जण जखमी झाले आहेत. एमव्ही जीएफएस गॅलेक्सी या कंटेनर जहाजावरील थर्ड इंजिनिअर हेरंब करमरकर यांचा मृत्यू झाला. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार हेरंब करमकर हे मर्चंट नेव्हीमध्ये कार्यरत होते. त्यांचं एमव्ही जीएफएस गॅलेक्सी हे जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीमधील ओमानच्या हद्दीतून जात असताना रविवारी पहाटे त्याच्यावर हल्ला झाला होता. या हल्ल्यामुळे जहाजावरील कर्मचारी अडकून पडले होते. यापैकी २३ जणांना वाचवण्यात यश आले. मात्र हेरंब यांना वाचवता आलं नाही. त्यांचा मृतदेह पुण्यातील त्यांच्या घरी आणण्यासाठी आता प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. पुण्यातील मुंढवा भागात त्यांचे घर आहे.

## विनायक राऊत आणि त्यांच्या कुटुंबियांचा अंतरिम संरक्षण जामीन अर्ज ठाणे न्यायालयाने फेटाळला

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- ठाकरे गटाचे नेते तथा माजी खासदार विनायक राऊत आणि त्यांच्या कुटुंबियांच्या अडचणीत वाढ झाली आहे. ठाणे न्यायालयाने त्यांचा अंतरिम संरक्षण जामीन अर्ज फेटाळला आहे. प्रथम खबरी अहवालातील (एफआयआर) आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याचे नमूद करत न्यायालयाने अंतरिम संरक्षण देण्यास नकार दिला. दरम्यान, मुख्य अटकपूर्व जामीन अर्जावर २३ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

विनायक राऊत, त्यांच्या कुटुंबीयांसह इतरांविरोधात त्यांची सून गिरीजा राऊत यांनी १० जून रोजी कापूरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा नोंदविला. या प्रकरणात फिरोज शेख या भोंदूला यापूर्वी अटक करण्यात आली असून तो सध्या पोलीस कोठडीत आहे. या गुन्ह्यात अटकेपासून संरक्षण मिळावे, यासाठी विनायक राऊत आणि कुटुंबीयांनी ठाणे न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. त्यावरील सुनावणीदरम्यान अंतरिम संरक्षणाची मागणी करण्यात आली होती. मात्र, एफआयआरमधील आरोपांचे गांभीर्य लक्षात घेता अंतरिम संरक्षण देता येणार नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवत अर्ज फेटाळला. त्यामुळे राऊत आणि त्यांच्या कुटुंबियांसमोरील कायदेशीर अडचणी वाढल्या असून, आता सर्वांचे लक्ष २३ जुलै रोजी होणाऱ्या मुख्य अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणीकडे लागले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला पाठिंबा देणार असल्याच्या बातम्या निराधार-सुप्रिया सुळे

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारकडून संसदेत मांडल्या जाणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पाठिंबा देणार असल्याच्या सर्व चर्चा निराधार आहेत. आमच्याकडे या विधेयकासंदर्भात कोणताही प्रस्ताव आलेला नाही. तसा प्रस्ताव आल्यास आम्ही त्यावर अभ्यास करुन २४ तासांमध्ये भूमिका मांडू, अशी स्पष्टोक्ती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली. त्या बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.



आज सकाळपासून शरद पवारांची राष्ट्रवादी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारची साथ देत मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणार असल्याची जोरदार चर्चा रंगली होती. यामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीने राज्यात महायुतीसोबत सत्तेत सामील होण्याच्यादृष्टीने आणखी एक पाऊल टाकल्याचे बोलले जात होते. मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला शरद पवार गट पाठिंबा देणार असल्याचे वृत्त सुप्रिया सुळे यांच्या हवाल्याने प्रसिद्ध झाले होते. मात्र, सुप्रिया सुळे यांनी या सगळ्यात कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले. आज सकाळपासून एक जबाबदार वर्तमानपत्र आणि प्रसारमाध्यमांमध्ये काही गोष्टी आल्या आहेत. पण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाबाबत कोणतीही अधिकृत भूमिका मांडलेली नाही. आमच्या पक्षाबद्दल आणि पक्षाच्या धोरणाबद्दल जी भूमिका वर्तमानपत्र आणि प्रसारमाध्यमांत आली आहे, ती सूत्रांकडून आली आहे. अधिकृतपणे कुठलंही स्टेटमेंट आमच्या पक्षाने केलेले नाही. मात्र, याबाबतच्या वृत्तामुळे गैरसमज निर्माण झाले. त्यामुळे आता मी शरद पवार साहेब, जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि आमच्या पक्षांच्या आमदार आणि खासदारांशी बोलून तुमच्यासमोर स्पष्टीकरण देण्यासाठी बसले आहे. जेणेकरून महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये कोणताही गैरसमज निर्माण होऊ नये, असे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले.

## अन्यथा बियाणे कंपन्यांची कार्यालये पेटवून देऊ, बच्चू कडू यांचा इशारा!

अमरावती दि.१५ (प्रतिनिधी)- 'एकीकडे शेतकरी नैसर्गिक संकटाचा सामना करीत आहेत, तर त्याचवेळी निकृष्ट दर्जाचे बियाणे विकणाऱ्या कंपन्या त्यांच्या आयुष्याशी खेळत आहेत. अशा कंपन्यांवर शासनाने कठोर कारवाई करावी, अन्यथा त्यांचे कार्यालय पेटवून देऊ,' असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे. निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे पीक, वर्षभराचा उदरनिर्वाह आणि आर्थिक डोलारा उद्ध्वस्त होत असल्याने संबंधित दोषींना कोणतीही दया न दाखवता कठोर शिक्षा करावी, अशी मागणी कडू यांनी केली आहे.

अमरावतीच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांच्या अहवालात बूस्टर कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांमध्ये गंभीर अनियमितता उघड झाल्या आहेत. भारतीय बीज प्रमाणीकरण मानकांचे उल्लंघन, एकाच उत्पादन क्षेत्रातील वेगवेगळे लॉट क्रमांक, बॅग-टॅग संख्येतील तफावत, दिशाभूल करणाऱ्या हमी, अप्रमाणित नमुन्यांची विक्री, तपासणीवेळी कागदपत्रे व आवश्यक माहिती न देणे आदी गंभीर बाबी अहवालात नमूद आहेत. कृषी विभागाने निकृष्ट बियाणे पुरवणाऱ्या कंपनीविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. मात्र, केवळ त्यावर न थांबता दोषी कंपन्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे परखड मत बच्चू कडू यांनी व्यक्त केले आहे. राज्यभर या कंपनीच्या विक्री झालेल्या बियाण्यांची विशेष तपासणी करून निकृष्ट बियाण्यांचा साठा जप्त करावा, अशी मागणी कडू यांनी केली. या प्रकरणात केवळ नोटीस किंवा दंड पुरेसा नसून, संबंधित कंपनीसह शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सर्व उत्पादक, वितरक व विक्रेत्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे बच्चू कडू म्हणाले.

## कर्जमाफीआधीच मुख्यमंत्र्यांचा सत्कार म्हणजे स्वत:ची पाठ स्वत: थोपटून घेण्याचा प्रकार-राजू शेट्टी

इंदापूर दि.१५ (प्रतिनिधी)- कर्जमाफीचा निर्णय हा मूठभर शेतकऱ्यांना फायद्याचा तर बहुसंख्य शेतकऱ्यांना नाराज करणारा आहे. मुख्यमंत्री हे अर्थशास्त्राचे जाणकार आहेत. त्यांनी वीस वर्षांपूर्वी पुस्तक लिहिलं होतं, अर्थसंकल्प कसा सादर करावा त्याला मी देखील हजर होतो. मुख्यमंत्र्यांनीच २०२४ ला निवडणुकीच्या वेळेस सांगितलं होतं की, आम्ही सरसकट कर्जमाफी करू असंही पुढे शेट्टींनी म्हटलं आहे.

विहीर खोदण्यासाठी ट्रॅक्टर घेण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून घेतलेलं कर्ज मुक्त करणे याला कर्जमुक्ती असे म्हणतात. ही कर्जमुक्ती नाही तर कर्ज वसुली आहे. ज्यांचे शेत आहे, ज्यांचे अर्धा एकर द्राक्ष आहेत, ज्यांचे डाळिंब आहे, तो छोटा शेतकरी आहे, त्याला फायदा होणार नाही. परदेशी राहणारा एक माणूस या समितीत आहे, त्यांना शेतकऱ्यांचे वाटोळ करायचं आहे ते केलं आहे. यातून फक्त काहीच मूठभर शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. सरकार शेतकऱ्यांना फसवत आहे. जे इन्कम टॅक्स भरतात ते देखील गरीब शेतकरी आहेत फक्त त्यांच्या खात्यावर पैसे येतात त्यामुळे ते इन्कम टॅक्स भरतात. उदाहरणच द्यायचं झालं तर जो कारखान्याला ऊस वाहतूक करतो त्याला कारखान्याचे पैसे येतात, ते वाटप करायचे असतात, मात्र त्याच्या खात्यावर येतात, त्याच्यामुळे तो वंचित राहतो आहे. त्यामुळे ही लोक देखील कर्जमाफीमध्ये आली पाहिजे, असंही पुढे राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे.

तर आज होत असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या सत्कारावरती बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, अंमलबजावणी करण्याआधीच सत्कार करणे म्हणजे हा लाळगोटेपणा आहे. स्वतःची पाठ स्वतः थोपटून घेणे असे याला म्हणतात. ३० जुलैच्या आधी देखील शेतकरी कर्जमाफी होणार नाही, आणखी नवीन तारीख मिळेल. ३० जुलैच्या आधी जर कर्जमाफी झाली नाही तर ३० जुलै नंतर आम्ही रस्त्यावरची लढाई सुरू करणार आहे, जोपर्यंत सरसकट कर्जमाफी होत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. जे रेगुलर कर्ज भरतात त्यांचं काय प्रामाणिकपणे राहून देखील त्यांना फक्त ५० हजार रुपये मिळणार असल्याचंही राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे.

## प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षातील नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश

पाटणा दि.१५ (वृत्तसंस्था)- बिहारच्या राजकारणातून एक मोठी घडामोड समोर आली आहे. प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाच्या अनेक ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. बिहार भाजपाचे अध्यक्ष संजय सरावगी यांच्या उपस्थित बुधवारी पाटणा येथील पक्षाच्या कार्यालयात पक्षप्रवेश पार पडला. बांकीपूर विधानसभेच्या पोटनिवडणुकीपूर्वी प्रशांत किशोर यांना हा मोठा झटका मानला जात आहे. जन सुराज पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढलेल्या उमेदवारांनी देखील भाजपात प्रवेश केला आहे.

जन सुराज पक्षाचे के. सी. सिन्हा, रितेश रंजन उर्फ बिट्टू सिंग, गोपाल सिंग आणि जन सुराज किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ब्रज किशोर सिन्हा यांनी आज भाजपात प्रवेश केला. २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत के.सी. सिन्हा यांनी कुम्हरारमधून, रितेश रंजन उर्फ बिट्टू सिंग यांनी दिघामधून आणि गोपाल सिंग यांनी मानेरमधून जन सुराज पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. बांकीपूर विधानसभेच्या पोटनिवडणुकीपूर्वी प्रशांत किशोर यांना हा मोठा झटका मानला जात आहे.

बांकीपूर विधानसभेची पोटनिवडणूक येत्या ३० जुलै रोजी होणार आहे. या निवडणुकीत प्रशांत किशोर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून, त्यांचा थेट मुकाबला भाजपाचे उमेदवार नीरज कुमार सिन्हा यांच्या विरोधात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षातील नेते भाजपात प्रवेश करत असल्याचे मत यावेळी संजय सरावगी यांनी मांडले. "पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेकजण भाजपात प्रवेश करत आहेत. देशातील अनेक लोक भाजपात प्रवेश करु पाहत आहेत", असे सरावगी माध्यमांशी बोलताना म्हणाले.

## लाडक्या बहिणी दोडक्या कशा झाल्या; शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांचा सवाल

पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- 'लाडकी बहीण' योजनेतून आता ९२ लाख महिला वगळण्यात आल्या आहेत. योजनेसाठी एकूण मंजूर खर्च २९ हजार ६९३ कोटी रुपये होता. मात्र, प्रत्यक्षात दाखविण्यात आलेला खर्च ३३ हजार २३७ कोटी रुपये असून, हा अतिरिक्त ३ हजार ५४१ कोटी रुपयांचा निधी आला कुठून, लाडक्या बहिणी दोडक्या कशा झाल्या,' असा सवाल शिवसेना (ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. हा निधी 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती' किंवा सामाजिक न्याय विभागाच्या तरतुदींमधून वळवण्यात आला का, याचे उत्तर महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिले पाहिजे, अशी मागणीही अंधारे यांनी केली.

त्या म्हणाल्या, 'या सगळ्याबाबत नियंत्रक आणि महालेखापरीक्षकाने (कॅग) महाराष्ट्र सरकारला स्पष्टीकरण मागितले आहे. अदिती तटकरे यांनी निधी तिकडेच का वळवला? पायाभूत सुविधांचा विचार केला नाही. पायाभूत सुविधांकडे लक्ष दिले असते, तर मोशी, चाकणमधील घटना घडल्या नसत्या. पैसे आमचे असताना टिमक्या तुमच्या वाजत आहेत. जेव्हा ही योजना आली, तेव्हा महिलांची त्या काळात तपासणी का केली नाही? जी तूट आहे, याबाबत अदिती तटकरे यांनी उत्तर द्यायला हवे.'

"लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थी महिलांची संख्या सुरुवातीला सव्वादोन कोटी होती. निवडणुका पार पडताच निकषांकडे बोट दाखवून महिलांना अपात्र ठरवणे सुरू झाले. पहिल्या टप्प्यात ७० लाख, दुसऱ्या टप्प्यात १२ लाख आणि तिसऱ्या टप्प्यात १० लाख अशा एकूण ९२ लाख महिला योजनेतून वगळण्यात आल्या. आता पगारी मतदारांची गरज उरली नाही म्हटल्यावर हळूहळू निकष दाखवून या योजनेत कपात केली गेली. एका महिलेचे वर्षाचे १८ हजार रुपये हिशेब धरल्यास ९२ लाख महिलांना वगळून सरकारने तब्बल १ लाख ६५ हजार ६०० कोटी रुपयांची कपात केली. महाराष्ट्राच्या जनतेचा हा पैसा कुठे गेला,' असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना: मुख्य अभियंत्यासह दोघे निलंबित

पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- मोशी कचरा डेपोत घडलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. कर्तव्यात निष्काळजीपणा, शासकीय कामात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामास अभय दिल्याचा ठपका दोघांवर ठेवण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोत 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या तीन मजली अनधिकृत इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून झालेल्या या भीषण दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला असून १२ कामगार जखमी झाले आहेत. या घटनेप्रकरणी अँटोनी लारा रिन्युव्हेबल एनर्जी कंपनीला दुर्लक्ष, कर्तव्यात कसुर आणि सुरक्षेतील गंभीर निष्काळजीपणाबाबत महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी (पान ४ वर)

# जीवनाचे मूल्यमापन

मानवी जीवन हे केवळ घटनांची मालिका नसून, अनुभवांची, निवडींची, मूल्यांची आणि जाणिवांची एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न म्हणजेच 'जीवनाचे मूल्यमापन'. हे मूल्यमापन कोणत्याही बाह्य निकषांवर मर्यादित नसते; ते अंतर्मुखतेतून, आत्मपरीक्षणातून आणि अनुभवांच्या सखोल चिंतनातून घडत असते. त्यामुळे जीवनाचे मूल्यमापन ही केवळ बौद्धिक प्रक्रिया नसून, ती एक अस्तित्ववादी शोधयात्रा आहे.परंपरेने समाजाने जीवनाचे मूल्यमापन ठरावीक निकषांवर केले आहे. संपत्ती, प्रतिष्ठा, पद, सामाजिक स्थान, यशाची बाह्य चिन्हे. या निकषांनुसार एखाद्याचे जीवन 'यशस्वी' किंवा 'अयशस्वी' ठरवले जाते; परंतु हे निकष जीवनाच्या संपूर्णतेला पकडू शकत नाहीत. कारण जीवनाचे खरे मूल्य केवळ बाह्य यशात नसून, ते अनुभवांच्या खोलीत, नात्यांच्या प्रामाणिकपणात, अंतर्मनाच्या शांततेत आणि मूल्यांशी असलेल्या निष्ठेत दडलेले असते. त्यामुळे जीवनाचे मूल्यमापन करताना बाह्य आणि अंतर्गत या दोन्ही स्तरांचा विचार करणे आवश्यक आहे.

जीवनाचे मूल्यमापन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती एखाद्या विशिष्ट क्षणी पूर्ण होत नाही; ती प्रत्येक अनुभवासोबत बदलत राहते. बालपणात जीवनाचे अर्थ वेगळे असतात, तर प्रौढत्वात ते बदलतात. संकटे, अपयश, यश, नाती, तुटणे, पुनर्निमिण या सर्व अनुभवांमुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत जातो. त्यामुळे जीवनाचे मूल्यमापन हे स्थिर नसून, ते गतिशील आहे. हीच त्याची वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे.अंतर्मुखता ही जीवनाच्या मूल्यमापनाची किल्ली आहे. जेव्हा माणूस स्वतःकडे प्रामाणिकपणे पाहतो, आपल्या कृतींचे, विचारांचे आणि भावनांचे परीक्षण करतो, तेव्हा तो जीवनाच्या अर्थाजवळ पोहोचतो. ही प्रक्रिया सोपी नसते, कारण ती स्वतःच्या मर्यादा, चुका आणि अपूर्णता स्वीकारण्याची मागणी करते; परंतु याच प्रक्रियेतून आत्मजाणीव विकसित होते. आत्मजाणीव ही जीवनाच्या मूल्यमापनाची सर्वात महत्त्वाची पायरी आहे, कारण ती माणसाला स्वतःच्या अस्तित्वाशी प्रामाणिक राहण्याची क्षमता देते.

जीवनाचे मूल्यमापन करताना मूल्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रत्येक व्यक्ती काही मूल्यांवर आधारित निर्णय घेत असते. सत्य, न्याय, करुणा, प्रामाणिकपणा, स्वातंत्र्य इत्यादी. या मूल्यांशी आपण कितपत प्रामाणिक राहिलो, हे जीवनाच्या गुणवत्तेचे एक महत्त्वाचे मापदंड ठरते. अनेकदा बाह्य यश मिळवताना माणूस या मूल्यांशी तडजोड करतो आणि नंतर त्याला एक प्रकारची रिक्तता जाणवते. त्यामुळे जीवनाचे मूल्यमापन करताना मूल्यांशी असलेली निष्ठा तपासणे आवश्यक आहे.नातेसंबंध हे जीवनाच्या मूल्यमापनातील आणखी एक महत्त्वाचे अंग आहे. माणूस सामाजिक प्राणी असल्यामुळे त्याचे जीवन इतरांशी जोडलेले असते. आपल्या नात्यांमध्ये किती प्रामाणिकपणा आहे, किती समजूतदारपणा आहे आणि किती सहानुभूती आहे यावर जीवनाची गुणवत्ता अवलंबून असते. केवळ वैयक्तिक यश मिळवणे पुरेसे नसते; त्या यशाचा इतरांवर काय परिणाम होतो, हेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे जीवनाचे मूल्यमापन हे वैयक्तिक आणि सामाजिक या दोन्ही स्तरांवर करणे आवश्यक आहे.

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जगात जीवनाचे मूल्यमापन अनेकदा बाह्य निकषांवरच मर्यादित राहते. 'अधिक मिळवणे', 'अधिक साध्य करणे' या ध्येयांमुळे माणूस सतत धावत राहतो; परंतु या धावपळीत तो स्वतःशी संवाद साधायला विसरतो. परिणामी, बाह्य यश असूनही अंतर्मनात असमाधान निर्माण होते. त्यामुळे आधुनिक काळात जीवनाचे मूल्यमापन अधिक सजगपणे करणे आवश्यक आहे. थांबून, स्वतःकडे पाहून, आपल्या जीवनाच्या दिशेचा विचार करणे ही प्रक्रिया जीवनाला अधिक अर्थपूर्ण बनवते. जीवनाचे मूल्यमापन करताना अपयशाची भूमिका देखील महत्त्वाची आहे. अपयश हे केवळ नकारात्मक अनुभव नसून, ते शिकण्याची आणि वाढण्याची संधी असते. अनेकदा अपयशातूनच माणूस स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यामुळे जीवनाचे मूल्यमापन करताना अपयशाला नाकारण्याऐवजी त्यातून काय शिकता येईल, याचा विचार करणे आवश्यक आहे. ही दृष्टी जीवनाला अधिक परिपक्व बनवते. जीवनाचे मूल्यमापन करताना आनंद आणि समाधान या संकल्पनांचाही विचार करावा लागतो. आनंद हा केवळ क्षणिक सुखात नसून, तो एक सखोल समाधानाचा अनुभव आहे. आपण जे करतो, त्यातून आपल्याला अर्थ मिळतो का? आपल्या जीवनात एक सुसंगती आहे का? हे प्रश्न जीवनाच्या मूल्यमापनात महत्त्वाचे ठरतात. जेव्हा माणूस आपल्या मूल्यांशी, ध्येयांशी आणि कृतींशी सुसंगत जीवन जगतो, तेव्हा त्याला खरे समाधान मिळते. जीवनाचे मूल्यमापन ही एक सखोल, अंतर्मुख आणि सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती केवळ बाह्य यशावर आधारित नसून, ती अंतर्मनाच्या शांततेवर, मूल्यांशी असलेल्या निष्ठेवर, नात्यांच्या गुणवत्तेवर आणि आत्मजाणिवेवर आधारित असते. या प्रक्रियेतून माणूस स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखतो आणि जीवनाला एक सखोल अर्थ प्राप्त करतो. आजच्या बदलत्या आणि गुंतागुंतीच्या जगात, जीवनाचे हे सजग मूल्यमापनच माणसाला संतुलित, समृद्ध आणि अर्थपूर्ण जीवन जगण्याची दिशा देऊ शकते.

# 'विश्वगुरू' म्हणण्याचा हा मूर्खपणा थांबवा ! अनुराधा पौडवालांचा 'राग'

नवी दिल्ली, दि. १५ (वृत्तसंस्था) – हिंदुस्थानला 'विश्वगुरू' करण्याच्या बाता मारणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल कमालीच्या भडकल्या आहेत. 'विश्वगुरू' होण्याची स्वप्ने पाहणे चुकीचे नाही. मात्र, देशात सध्या नेमक्या त्याच्या उलट गोष्टी सुरू आहेत. त्यामुळे एक तर त्या चुकीच्या गोष्टी बंद करा किंवा 'विश्वगुरू', 'विश्वगुरू' म्हणण्याचा मूर्खपणा थांबवा,' असे खडे बोल पौडवाल यांनी सुनावले आहेत.

शुभांकर मिश्रा यांच्या पॉडकास्टमध्ये अनुराधा पौडवाल बोलत होत्या. '२०४७ पर्यंत हिंदुस्थान विश्वगुरू होणार असल्याचे बोलले जाते, याबद्दल तुम्हाला काय वाटते असा प्रश्न पौडवाल यांना विचारण्यात आला. त्यावर बोलताना देशातील सध्याची स्थिती आणि भाजपच्या 'विश्वगुरू'केंद्री प्रचारावर पौडवाल यांनी परखड भाष्य केले. 'काही वर्षांपूर्वीपर्यंत मलाही खूप वाटायचे की आपण विश्वगुरू बनू शकतो. पण आता असं दिसतं की विश्वगुरू होण्यासाठी जे काही करायला हवे, नेमक्या त्याच्या उलट गोष्टी देशात सुरू आहेत. एक तर या गोष्टी बंद व्हायला हव्यात किंवा मग 'विश्वगुरू', 'विश्वगुरू' हा जप बंद करावा,' असे त्यांनी सुनावले.

**'विश्वगुरू'चा पाया काय?**

'विश्वगुरू बनायचे असेल तर आम्हाला आधी शिक्षित व्हावे लागेल. पण देशात ९३ लाख शाळा बंद पडल्या आहेत. हे पाहिल्यावर प्रश्न पडतो की विश्वगुरू होण्याचा पाया काय आहे? तो काहीतरी असला पाहिजे. नुसत्या स्वप्नांवर जगता येत नाही. काहीतरी ठोस असायला पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

# 'भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा : महाराष्ट्राच्या जलसुरक्षेची वैज्ञानिक वाटचाली

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन यांचा ५४ वा वर्धापन दिन**

**महाराष्ट्रातील** प्रत्येक दहा ग्रामीण घरांपैकी जवळपास आठ घरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार भूजल आहे. त्यामुळे भूजल ही राज्याच्या जलसुरक्षेची जीवनवाहिनी ठरली आहे. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यांसारखी आव्हाने भूजल व्यवस्थापनासमोर उभी असली, तरी वैज्ञानिक नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, प्रभावी पुनर्भरण उपाययोजना आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून या आव्हानांवर निश्चितपणे मात करता येऊ शकते. जलसुरक्षा ही आज केवळ विकासाशी संबंधित बाब नसून पर्यावरणीय समतोल, कृषी समृद्धी, सार्वजनिक आरोग्य आणि भावी पिढ्यांच्या सुरक्षित भवितव्याशी निगडित राष्ट्रीय प्राधान्याचा विषय बनली आहे. अशा परिस्थितीत भूजलाचा प्रत्येक थेंब हा राज्याच्या जलसंपत्तीचा अमूल्य ठेवा असून त्याचे वैज्ञानिक शोधकार्य, नियोजनबद्ध विकास, संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापन ही काळाची अत्यावश्यक गरज आहे. याच ध्येयाने महाराष्ट्र शासनाची भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (Groundwater Surveys and Development Agency - GSDA) गेल्या पाच दशकांहून अधिक काळ भूवैज्ञानिक संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, जलस्रोतांचे वैज्ञानिक मूल्यमापन आणि लोकाभिमुख योजनांच्या माध्यमातून राज्याच्या जलसुरक्षेला बळकटी देत आहे. ग्रामीण व शहरी भागातील सुरक्षित पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, भूजल पुनर्भरण, जलसंधारण आणि शाश्वत जलव्यवस्थापनासाठी भूजल सर्वेक्षणची भूमिका आज अधिक महत्त्वपूर्ण ठरली असून, भविष्यातील जलसुरक्षित महाराष्ट्र घडविण्यात ही संस्था अग्रणी भूमिका बजावत आहे




| घटक | माहिती |
|---|---|
| स्थापना | १९७२ |
| मुख्यालय | पुणे |
| भूजलशास्त्रीय नकाशे | २५,१५२ गावे |
| सर्वेक्षण क्षेत्र | १,७६,१२५ चौ.कि. |
| निरीक्षण विहिरी | ३,९२० |
| पिझोमीटर | १,१५० |
| नकाशा प्रमाण | १ : १०,००० |

सन १९७२ मध्ये इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन (IDA) आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त प्रकल्पांतर्गत भूजलावर आधारित लघु सिंचन योजनांच्या विकासासाठी या यंत्रणेची स्थापना करण्यात आली. त्या काळात भूजलाचा शोध मुख्यतः अनुभवाधारित पद्धतीने घेतला जात होता. वैज्ञानिक भूजल मूल्यांकन, भूभौतिकीय सर्वेक्षण किंवा जलधारकांचा (ऑीिंळषशशी) अभ्यास फारसा विकसित नव्हता. जीएसडीएच्या स्थापनेनंतर भूगर्भशास्त्र, भूभौतिकी, जलविज्ञान आणि अभियांत्रिकी या शाखांचा समन्वय साधून भूजल व्यवस्थापनाला वैज्ञानिक दिशा मिळाली. पुढील काही दशकांत ही संस्था केवळ विंधन विहिरींची स्थळिनश्चिती करणारी यंत्रणा न राहता भूजल संशोधन, जलगुणवत्ता, कृत्रिम पुनर्भरण, भूजल नियोजन आणि धोरणनिर्मितीमध्ये राज्याची अग्रगण्य तांत्रिक संस्था म्हणून विकसित झाली. सन १९७४ पासून राज्यात १ : १०,००० प्रमाणातील गावनिहाय सखोल भूजलशास्त्रीय सर्वेक्षण सुरू करण्यात आले. महाराष्ट्रातील जलव्यवस्थापनाच्या इतिहासात हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या सर्वेक्षणामध्ये भूगर्भीय रचना, जलधारकांचे स्वरूप, भूजल पातळीतील हंगामी बदल, विहिरींची स्थिती, पुनर्भरण क्षमता आणि जलस्रोतांची उपलब्धता यांचा व्यापक अभ्यास करण्यात आला. आजपर्यंत १,७६,१२५ चौ.कि.मी. क्षेत्रातील २५,१५२ गावांचे भूजलशास्त्रीय नकाशे तयार करण्यात आले आहेत. हे नकाशे ग्रामीण नळपाणी पुरवठा, सिंचन विकास, कृत्रिम भूजल पुनर्भरण, जलसंधारण, पाणलोट विकास आणि विविध शासकीय प्रकल्पांसाठी मूलभूत संदर्भ म्हणून वापरले जातात.

१९७८ मध्ये पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहिरींचा विशेष कार्यक्रम सुरू झाला. १९८३ च्या दुष्काळात टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात जीएसडीएने महत्त्वाची भूमिका बजावली. १९८६ मध्ये संशोधन व विकास कक्ष आणि विशेष प्रकल्प विभागाची स्थापना झाल्यानंतर भूजल पुनर्भरण, भूभौतिकीय संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजनांना चालना मिळाली. पुढे महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ आणि महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ यांच्या अंमलबजावणीमध्येही जीएसडीएची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण बनली. जलविज्ञान प्रकल्प, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प, जलस्वराज्य प्रकल्प आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रमांमुळे संस्थेच्या कार्याचा विस्तार झाला. २०२६ पर्यंत जीएसडीएने भूजल नियोजन, डिजिटल डेटाबेस, जलगुणवत्ता विश्लेषण आणि जलसुरक्षा आराखड्यांच्या माध्यमातून आधुनिक जलव्यवस्थापनाची भक्कम पायाभरणी केली आहे.

महाराष्ट्राचा सुमारे ८२ टक्के भूभाग डेक्कन ट्रॅपच्या बेसॉल्ट खडकांनी, तर सुमारे १० टक्के भूभाग रूपांतरित खडकांनी व्यापलेला आहे. या कठीण खडकांमध्ये भूजल नदीप्रमाणे वाहत नाही; ते खडकांतील भेगा, सांधे आणि अपक्षयित स्तरांमध्ये साठते. त्यामुळे भूजलाचा शोध घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. जीएसडीएने रिमोट सेन्सिंग, भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (GPS), भूभौतिकीय सर्वेक्षण, रेजिस्टिव्हिटी मीटर, व्हेरी लो फ्रिक्वेन्सी, डिजिटल लॉगर आणि जलधारक चाचण्या यांसारख्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे.

आज राज्यातील ३,९२० निरीक्षण विहिरी आणि १,१५० पिझोमीटर यांच्या माध्यमातून भूजल पातळीचे राज्यातील पाच प्रमुख नदीखोऱ्यांतील १,५३५ पाणलोट क्षेत्रांमध्ये उभारलेल्या ३,९२० निरीक्षण विहिरी आणि १,१५० पिझोमीटर यांच्या माध्यमातून भूजल पातळीचे नियमित निरीक्षण केले जाते. अनेक दशकांपासून सातत्याने संकलित झालेला हा व्यापक डेटाबेस महाराष्ट्रातील भूजल नियोजनाचा वैज्ञानिक पाया मानला जातो. या माहितीच्या आधारे भूजल उपलब्धतेचे अचूक मूल्यांकन, जलस्रोतांचे नियोजन, कृत्रिम भूजल पुनर्भरणासाठी योग्य स्थळांची निवड, जलसुरक्षा आराखडे तयार करणे तसेच संभाव्य पाणीटंचाईचे वैज्ञानिक पूर्वानुमान करणे शक्य होते. माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया विकसित करून राज्यातील भूजल व्यवस्थापन अधिक अचूक, परिणामकारक आणि शाश्वत करण्यामध्ये या डेटाबेसचे मोलाचे योगदान आहे.

ग्रामीण भागातील सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यात जीएसडीएची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. नळपाणी पुरवठा योजनांसाठी विंधन विहिरी, साध्या विहिरी आणि इतर संभाव्य जलस्रोतांचे सर्वेक्षण, स्थळिनश्चिती आणि तांत्रिक प्रमाणीकरण ही कामे यंत्रणेकडून केली जातात. त्यानंतर जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि संबंधित अंमलबजावणी संस्था त्या योजनांची उभारणी करतात. त्यामुळे प्रत्येक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमागे भूजलशास्त्रीय पडताळणीचा भक्कम पाया असतो. याशिवाय बँक वित्तसहाय्यित सिंचन योजना, शेतकऱ्यांसाठी विहिरींची स्थळनिश्चिती, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत स्रोत बळकटीकरण तसेच विविध शासकीय आणि निमशासकीय संस्थांना तांत्रिक सल्ला देण्याचे कार्यही जीएसडीए सातत्याने करीत आहे. राज्यातील कठीण खडकप्रधान भूभागात भूजलाचा शोध घेण्यासाठी भूभौतिकीय सर्वेक्षण ही जीएसडीएची सर्वात महत्त्वाची वैज्ञानिक कार्यपद्धती आहे. जमिनीखालील जलधारकांचे स्वरूप, खोली, जाडी आणि जलसाठ्याची क्षमता जाणून घेण्यासाठी रेझिस्टिव्हिटी मीटर, व्हेरी लो फ्रिक्वेन्सी आणि इतर विद्युतचुंबकीय उपकरणांचा वापर केला जातो. खडकांच्या विद्युत रोधकतेचे मापन करून भूजलधारकांची अचूक माहिती मिळते आणि त्याआधारे विंधन विहिरींसाठी योग्य स्थळे निश्चित केली जातात. ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांपासून कृत्रिम भूजल पुनर्भरणापर्यंत सर्वच कामांमध्ये या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होत आहे. जलधारकांचे स्वरूप समजल्यामुळे विंधन विहिरींचे यशाचे प्रमाण वाढते, अनावश्यक खर्च टाळला जातो आणि पाण्याचा अधिक परिणामकारक वापर शक्य होतो.

कठीण बेसॉल्ट प्रदेशासाठी जीएसडीएने विकसित केलेल्या अपारंपरिक भूजल पुनर्भरण तंत्रज्ञानाने महाराष्ट्राने या क्षेत्रात स्वतंत्र तांत्रिक ओळख निर्माण केली आहे.

जलभंजन, फ्रॅक्चर सील सिमेंटेशन, बोर ब्लास्ट तंत्र, स्ट्रीम ब्लास्ट तंत्र, विहीर जॅकेटिंग आणि इतर वैज्ञानिक उपाययोजनांद्वारे कमी पाणी देणाऱ्या विंधन विहिरींची उत्पादनक्षमता वाढविण्यात यश आले आहे. या तंत्रज्ञानामुळे हजारो गावांतील पिण्याच्या पाण्याचे स्रोत पुनर्जीवित झाले असून अनेक ठिकाणी टँकरवरील अवलंबित्व कमी झाले आहे. विशेष म्हणजे, कठीण खडकप्रधान प्रदेशासाठी विकसित करण्यात आलेल्या या उपाययोजनांचा अभ्यास इतर राज्यांतील जलतज्ज्ञ आणि संशोधकांकडूनही केला जात आहे.

भूजल उपलब्ध असणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते सुरक्षित आणि पिण्यायोग्य असणेही आवश्यक आहे. म्हणूनच जीएसडीएच्या आधुनिक प्रयोगशाळांमध्ये फ्लोराईड, नायट्रेट, लोह, क्लोराईड, क्षारता, कठोरता, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम आणि इतर रासायनिक घटकांचे नियमित विश्लेषण केले जाते. गुणवत्ताबाधित गावांमध्ये पर्यायी स्रोत शोधणे, स्रोतांचे बळकटीकरण करणे, कृत्रिम पुनर्भरणाच्या उपाययोजना सुचविणे आणि स्थानिक परिस्थितीनुसार तांत्रिक मार्गदर्शन करणे ही महत्त्वाची कामे यंत्रणेकडून केली जातात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेबरोबरच ग्रामीण आरोग्य संरक्षणालाही मोठा हातभार लागतो. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध जलसंधारण आणि पाणीपुरवठा योजनांमध्ये जीएसडीएची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अटल भूजल योजना अंतर्गत भूजल-अतिवापरित भागांमध्ये ग्रामस्तरीय जलसुरक्षा आराखडे तयार करणे, भूजल बजेट विकसित करणे, पाण्याचा ताळेबंद तयार करणे, भूजल पातळीचे नियमित निरीक्षण करणे आणि लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन विकसित करणे ही कामे यंत्रणेकडून केली जात आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक ग्रामीण घरापर्यंत सुरक्षित नळाद्वारे पिण्याचे पाणी पोहोचविण्यासाठी शाश्वत जलस्रोत निश्चित करणे, विंधन विहिरींची स्थळिनश्चिती, स्रोतांची क्षमता चाचणी, जलगुणवत्तेचे प्रमाणीकरण आणि स्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना सुचविणे या जबाबदाऱ्या जीएसडीए यशस्वीपणे पार पाडत आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) अंतर्गत जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास, कृत्रिम भूजल पुनर्भरण आणि सिंचनासाठी उपलब्ध भूजल संसाधनांचे वैज्ञानिक नियोजन करून 'प्रत्येक थेंबातून अधिक पीक' या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ दिले जात आहे.

जीएसडीएचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पाणीटंचाईचे वैज्ञानिक पूर्वानुमान, भूजल उपलब्धता ही पर्जन्यमान, भूगर्भीय रचना, भूजलाचा उपसा आणि पुनर्भरण यांवर अवलंबून असल्यामुळे दरवर्षी सप्टेंबर अखेरील पर्जन्यमान आणि ऑक्टोबरच्या प्रारंभी नोंदविलेल्या भूजल पातळीचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. राज्यातील निरीक्षण विहिरींमधून संकलित माहितीचे विश्लेषण करून कोणत्या भागात ऑक्टोबर, जानेवारी किंवा एप्रिलपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ शकते, याचा वैज्ञानिक अंदाज शासनाला दिला जातो. त्यामुळे टँकर नियोजन, पर्यायी स्रोत विकसित करणे, स्रोत बळकटीकरण आणि इतर उपाययोजनांचे नियोजन वेळेवर करता येते. जलसंकटाचा सामना करण्यासाठी ही माहिती प्रशासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

पूर्वी दुष्काळ ही महाराष्ट्रासमोरील प्रमुख जलसमस्या मानली जात होती; मात्र आज हवामान बदलामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. अल्प कालावधीत होणारी अतिवृष्टी आणि त्यानंतरचे दीर्घ कोरडे कालखंड ही नव्या हवामान व्यवस्थेची वास्तवता बनली आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी वाहून जाते, तर भूजल पुनर्भरणाचे प्रमाण अपेक्षेइतके वाढत नाही. दुसरीकडे शेती, उद्योग आणि शहरी भागातील पाण्याची मागणी सातत्याने वाढत असल्याने भूजलावरील ताण अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे पारंपरिक जलनियोजनाची समीकरणे बदलत असून भूजल पुनर्भरण, जलसंधारण आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर जीएसडीए दीर्घकालीन भूजल पातळी निरीक्षण, पर्जन्यमान विश्लेषण, ऋखड आधारित भूजल मॉडेलिंग, जलगुणवत्ता निरीक्षण आणि कृत्रिम भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांवर विशेष भर देत आहे. गावस्तरीय पाण्याचा ताळेबंद, पर्जन्यजल संधारण, जलसंधारण आणि भूजलाचा कार्यक्षम वापर या संकल्पनांद्वारे भविष्यातील जलसुरक्षेचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी यंत्रणा सातत्याने प्रयत्नशील आहे.

भविष्यात भूजल व्यवस्थापनात कृत्रिम बुद्धिमत्ता (ऑींळषळलळरश्र खपींशश्रळसशपलश), मशीन लर्निंग, बिग डेटा विश्लेषण, ड्रोन सर्वेक्षण, इंटरनेट ऑफ थिंग्स (खेढ), रिअल-टाइम भूजल निरीक्षण प्रणाली आणि डिजिटल निर्णय सहाय्य प्रणाली यांचा अधिक व्यापक वापर होणार आहे. प्रत्येक गावासाठी जलसुरक्षा आराखडा, भूजल बजेट, जलवापर लेखापरीक्षण, भूजल पुनर्भरण आराखडा आणि जलसाक्षरता अभियान प्रभावीपणे राबविणे ही काळाची गरज आहे. विज्ञानाधारित नियोजन, सक्षम प्रशासन आणि लोकसहभाग यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच राज्याच्या जलसंपत्तीचे दीर्घकालीन संरक्षण शक्य होईल.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची पाच दशकांची वाटचाल ही केवळ एका शासकीय संस्थेची यशोगाथा नाही, तर विज्ञान, संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि लोकसहभाग यांच्या बळावर उभे राहिलेले महाराष्ट्राच्या जलसुरक्षेचे सक्षम मॉडेल आहे.

बदलत्या हवामानाच्या आणि वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भूजलाचे संरक्षण, पुनर्भरण आणि सुयोग्य व्यवस्थापन ही सामूहिक जबाबदारी बनली आहे. शासन, तज्ज्ञ संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, शेतकरी आणि नागरिक यांनी संयुक्तपणे भूजल संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप दिल्यासच 'जलसमृद्ध महाराष्ट्र' हे स्वप्न साकार होईल. कारण भूजलाचे संरक्षण म्हणजे केवळ पाण्याचे संरक्षण नव्हे, तर भावी पिढ्यांच्या सुरक्षित, समृद्ध आणि शाश्वत भविष्याची हमी आहे.

**– डॉ. कैलास रामभाऊ आहेर**
वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर

# 'अमृतजिव्हा' ल्यायलेला पत्रकारितेतील 'डॉक्टर'!

'अरें योगेंश, आज काय लिहिंलंस ? आज कार्यक्रम कांय ? अरें तूं बोंलावलंस आणि मीं येणार नांहीं, अंसं शंक्यं तरी आहे कां ? अरे तूं आणि विजंय वैंद्य हे मांझ्यांसाठीं परकें आहेत कां ? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठांकरे यांच्या सांन्निध्यातले आंपण !' असं थोंडसं नांकांतून बोलणं, कुणालाही न दुखावणं, आपलं काम भलं आणि आपण भलं. लिहिणं परखड, लिखाणातून 'प्रहार' करणं, 'मागणी तसा पुरवठा' हे तत्त्व तंतोतंत पाळणं, हळूहळू सर्व सोपान पादाक्रांत करणं, यासाठी जीभेवर साखर, डोक्यावर बर्फ आणि पायाला भिंगरी असा अमृतजिव्हा ल्यायलेला पत्रकारितेतील 'डॉक्टर'म्हणजे सुकृत खांडेकर ! अशी 'अमृतजिव्हा' ल्यायलेले मराठी पत्रकारितेतील डॉक्टर सुकृत खांडेकर हे आपल्या वयाची ७४, वर्षे पूर्ण करुन ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. सध्याचा काळ हा देशभरात 'अमृतकाळ' समजण्यात, मानण्यात येतोय. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली असून या स्वातंत्र्याला येत्या १५ ऑगस्ट रोजी ७९ वर्षे पूर्ण होत आहेत. (अर्थात भारतीय जनता पक्षाचे लोक २०१४ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले असे मानतात). पंतप्रधान नरेंद्र दामोदरदास मोदी हेही अमृतमहोत्सवी वर्षात वाटचाल करीत आहेत. अनेक जण अमृतमहोत्सव साजरा करीत असतांनाच डॉ. सुकृत खांडेकर हे अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहेत ही 'अमृताहुनी गोड' बातमी आहे. वसंतराव त्रिवेदी या माझ्या पत्रकारितेतील विद्यापीठातून पत्रकारितेची पदवी प्राप्त करुन मी १९७३ साली माझी पत्रकारिता सुरु केली. वसंतराव त्रिवेदी यांनी ११ जून १९६६ रोजी सुरु केलेल्या साप्ताहिक आहुति मधून सुरु झालेली माझी पत्रकारिता नवशक्ति, सन्मित्र, ठाणे वैभव, मुंबई सकाळ करीत करीत हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या दैनिक सामना मध्ये १५ डिसेंबर १९८८ पासून मुंबई च्या पत्रकारितेत स्थिरावली. १९८९ साली २३ जानेवारी रोजी दैनिक सामना चे दादरच्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्मारकात दस्तुरखुद्द हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी मुख्य संपादक या नात्याने सामना चे प्रकाशन केले. याच वर्षी मी राजकीय प्रतिनिधी म्हणून मंत्रालय आणि विधिमंडळ येथे कार्यरत झालो. याच ठिकाणी सुकृत खांडेकर यांच्या संपर्कात आलो. त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे सहचिटणीस म्हणून जबाबदारी स्वीकारली. शिवसेनेचे नगरसेवक नारायण तातू राणे हे मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) समितीचे अध्यक्ष या नात्याने मंत्रालयात पत्रकार परिषद घेण्यासाठी आले. त्यावेळी तेलुगू देसमचे सर्वेसर्वा नंदमुरी तारक रामाराव अर्थात एन टी रामाराव यांची चलती होती. त्यांना एनटीआर म्हणून ओळखायचे. नारायण राणे हे मंत्रालयात आले तेंव्हा मी सुकृत खांडेकर यांना सांगितले की, हे महाराष्ट्राचे 'एनटीआर' आहेत. (नारायण तातू राणे) सुकृत खांडेकर यांनी तसा उल्लेख केला. नारायण राणे यांच्या सहित सारेच आश्चर्यचकित झाले. सुकृत खांडेकर यांनी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष होण्याची हॅटट्रिक केली. तशी ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य यांनी सुद्धा ठाणे जिल्हा पत्रकार संघ तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ या दोन्ही ठिकाणी अध्यक्षपदाची हॅटट्रिक केली आहे. सुकृत खांडेकर हे प्रारंभी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या केसरी मध्ये वार्ताहर म्हणून कार्यरत असतांना विधानपरिषद दीर्घेत (पत्रकार गॅलरीत) शेवटच्या बाकावर बसून वार्तांकन करीत असत. लोकमान्य टिळक यांचे नातू जयंतराव टिळक हे विधानपरिषदेचे सभापती होते. त्यामुळे सुकृत खांडेकर यांना डोळ्यात तेल घालून काम करायला लागायचे. अर्थात केसरीचे मालक जरी असले तरी जयंतरावांचा हस्तक्षेप नसायचा, मार्गदर्शन जरुर करीत. सुकृत खांडेकर यांनी मग हळुहळू लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स या आघाडीच्या वर्तमानपत्रात काम करतांना अगदी नवी दिल्ली येथे सुद्धा संसदेच्या सभागृहात वार्तांकन केले. ज्या केसरी मध्ये वार्ताहर म्हणून काम केले त्याच केसरीचे संपादक होण्याचा बहुमान सुद्धा त्यांना लाभला. नवी दिल्ली येथे संसदेत पत्रकार म्हणून सुकृत खांडेकर यांना जाण्यासाठी मित्रवर्य विजय तारी यांनी सुद्धा उत्तम भूमिका बजावली आहे. मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, मुंबई मराठी पत्रकार संघापासून अगदी खऱ्याखुऱ्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी सुकृत खांडेकर यांना मिळाली. एका बाजूला वर्तमानपत्रात काम दुसरीकडे संघटनांच्या जबाबदाऱ्या ही तारेवरची कसरत आपल्या 'अमृतजिव्हे' मुळेच उत्तमरित्या पार पाडू शकले. शरद पवार यांच्या पासून राष्ट्रीय नेत्यांमध्ये उठबस करण्याचेही भाग्य त्यांना लाभले. मुंबई मध्ये नवशक्तिचे संपादक म्हणून काम केल्यानंतर त्यांची हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रबोधन प्रकाशन परिवारात काम करण्याची इच्छा होती. परंतु तो योग आला नसला तरी बाळासाहेब ठाकरे यांच्या संपादकत्वाखाली सुरू झालेल्या आणि शिवसेनेचे मुखपत्र म्हणून ओळखण्यात येणाऱ्या दैनिक सामना या राजकीय पक्षाच्या वर्तमानपत्रावर प्रचंड अभ्यास करुन सुकृत खांडेकर यांनी लोकमान्य टिळक विद्यापीठात प्रबंध सादर केला. या टिळक विद्यापीठातून त्यांनी पीएचडी करुन डॉक्टरेट मिळवली. योगायोग असा की जेंव्हा सुकृत खांडेकर यांना डॉक्टरेट मिळाली त्या वेळी ते शिवसेनेचे कट्टर राजकीय विरोधक असलेल्या नारायण राणे यांच्या 'प्रहार' चे संपादक होते. ज्या दिवशी सुकृत खांडेकर यांनी डॉक्टरेट मिळवली त्या दिवशी त्यांनी नारायण राणे यांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेंव्हा नारायण राणे यांनी आनंदित होऊन सामना, शिवसेना आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल मनात कटुता न ठेवता खांडेकर यांना स्वतः पेढा भरविला आणि त्यांचे तोंड गोड करीत त्यांच्या आनंदात सहभागी झाले. वास्तविक मराठी पत्रकार संघटनांच्या दृष्टीने ही मोठी अभिमानाची बाब आहे. म्हणून पत्रकार संघटनांनी डॉ सुकृत खांडेकर यांचा माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख आणि मार्मिक, सामना व दोपहर का सामना चे मुख्य संपादक उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते तसेच माजी मुख्यमंत्री खासदार आणि प्रहारचे मुख्य सल्लागार संपादक नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सत्कार केला असता तर मराठी पत्रकारितेत एक वेगळे चित्र निर्माण झाले असते. असो, अजूनही वेळ गेलेली नाही. विविध पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन डॉ सुकृत खांडेकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात हा अमृततुल्य योग घडवून आणावा. सध्या डॉ सुकृत खांडेकर हे संपूर्ण महाराष्ट्रात स्टेट लाईन, इंडिया कॉलिंग, बॉम्बे कॉलिंग या नावाने स्तंभलेखन करीत असून कुणाचाही मुलाहिजा बाळगत नाहीत. सातत्याने घडणाऱ्या घटनांवर प्रहार करुन पत्रकारितेत नवशक्ति निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. केसरी , जांभळा, पिवळा, हिरवा हे कोणतेही रंग त्यांना वर्ज्य नाहीत. तसे ते गुलाबीच आहेत. अर्थात हे करतांना कोणत्याही घटकांशी सामना न करता सौजन्यपूर्ण, सौहार्दपूर्ण निकोप वातावरण कसे होऊ शकेल याची पुरेपूर दक्षता ते घेत आहेत. डॉ. सुकृत खांडेकर यांच्या अमृतजिव्हेतून झिरपणारे गोड अमृतवचन ऐकण्याची, जाणून घेण्याची संधी प्राप्त करावी. यासाठी मराठी पत्रकारितेतील विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलेल्या डॉ सुकृत खांडेकर यांना उदंड आयुष्य आणि ठणठणीत आरोग्य प्राप्त होवो, त्यांचे मार्गदर्शन मराठी पत्रकारितेला सातत्याने मिळत राहो, या मनःपूर्वक शुभेच्छा !

**–योगेश वसंत त्रिवेदी,**
९८९२९३५३२१. (लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत).

# मेघदूत

**आज आषाढ शुद्ध प्रतिपदा महिन्याचा प्रारंभ.**

आषाढाची सुरवात म्हटलं की हटकून आठवण येते ती महाकवी कालिदासाची आणि त्याने रचलेल्या मेघदूत या महाकाव्याची.हा दिवस कालिदास दिन म्हणून ओळखला जातो.एका यक्षाला त्याच्या कर्तव्यचुकीमुळे यक्षराज कुबेर, एक वर्षाची हदपारीचा शाप (शिक्षा) देतो आणि आज्ञा देतो अलका नगरीपासून लांब अशा रामगिरी पर्वतावर राहण्याची. विरहात तळमळणारा हा यक्ष आकाशातल्या मेघाला पाहतो आणि त्याला दूत बनवून आपल्या पत्नीला निरोप पाठवतो. अशी रंजक कथा! रामगिरीपासून ते अलकानगरीपर्यंत जाताना लागणारे अवंती देश, विदिशा नगरी, ब्रह्मवर्त, कुरुक्षेत्र, गंगोत्री, दिमधवल पर्वत, त्यातील लागणारी नगरे आणि निसर्ग ह्याचे वर्णन तो मेघाला विस्तृतपणे सांगतो. अशी ही मेघदूतातली कविकल्पना

**आषाढस्य प्रथम दिवसे मेघमाश्लिष्टसानुं**
**वप्रक्रिडा –परिणत गज–प्रेक्षणीयं ददर्श**

संस्कृत मध्ये असलेली गीता ज्ञानेश्वर माउलींनी सामान्य जनांसाठी मराठीत आणली. अगदी तसाच प्रयत्न मेघदूताचा अनुवाद मराठीत करून महाराष्ट्र बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धनांनी केला आहे. त्यातलं हे अगदी कमी ऐकलं गेलेलं गाणं खासकरून आषाढाच्या पहिल्या दिवशी आषाढाच्या पहिल्या दिवशी अवचित दिसशी मला म्हणूनिया, विनवित मेघा तुला...

रामगिरीवर एक यक्ष मी
काळ कंठितो विरही कामी
कसा सांगू मी शाप भोगतो ,व्यथा जाळते मला
म्हणुनिया, विनवीत मेघा तुला.

स्विकारी या कुटजफूलांतें
एक प्रार्थना प्रसन्न चित्ते
स्वागत करितो प्रितिवचने, प्राणही हा पोळला
म्हणुनिया,विनवीत मेघा तुला.

तुला पाहुनी सुखासीनही
कातर होती,होती विरही
कथा काय मग कण्ठमिठीचा, प्रिय ज्यांचा तुटला
म्हणुनिया , विनवीत मेघा तुला.

तप्तांचा तू असशी आश्रय
इंद्रसचिव तू ,तू करुणामय
निरोप माझा घेऊन जाई,अलकानगरीला
म्हणुनिया, विनवीत मेघा तुला.

प्रिया दूर ममब तिला भेटशील
मनी वाटते नाही न म्हणशील
विफल विनवणी सुजनी,बरवी नको शठी सफला
म्हणुनिया , विनवीत मेघा तुला.

कुठला घ्यावा मार्ग प्रथम तो
सांगुनी नंतर निरोप कथितो
दूत होऊनि पोचिव माझ्या, दु:खी दयीतेला
म्हणुनिया , विनवीत मेघा तुला.

गीत : डॉ .वसंतराव पटवर्धन
स्वर / संगीत : पंडित जितेंद्र अभिषेकी

**– प्रसाद जोग.सांगली.**
९४२२०४११५०

# गोवा येथील सनातन आश्रमाला नाणीजधाम येथील जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांची सदिच्छा भेट!

## सात्त्विकता आणि संघटन हीच राष्ट्राच्या उत्कर्षाची गुरुकिल्ली ! – अनंत विभूषित जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी

फोंडा (गोवा) – कलियुगाच्या आव्हानात्मक काळात केवळ भक्ती असून चालणार नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःमधील सात्त्विकता जागृत करून संघटित होणे, ही काळाची गरज आहे. मानव जन्मातच आपले नशीब बदलण्याचे सामर्थ्य असून योग्य गुरूंच्या मार्गदर्शनाखाली कार्य केल्यास विश्वशांतीचे ध्येय गाठता येईल, असे ओजस्वी मार्गदर्शन रामानंदाचार्य दक्षिण पीठ, नाणीजधाम (रत्नागिरी) येथील अनंत विभूषित जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांनी व्यक्त केले. जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांनी रामनाथी, गोवा येथील सनातन आश्रमाला मंगलमय भेट दिली. या वेळी केलेल्या मार्गदर्शनात त्यांनी समष्टीपर संदेश दिला.

'सनातन प्रभात' प्रसारमाध्यम समूहाचे संपादक श्री. योगेश जलतारे यांनी त्यांना सनातन आश्रमात चालू असलेले राष्ट्र आणि धर्म, तसेच आध्यात्मिक संशोधन यांविषयीच्या कार्याची माहिती दिली. या वेळी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचीही त्यांनी भेट घेतली. सनातन संस्थेचे पू. पृथ्वीराज हजारे यांच्या शुभहस्ते जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांचा भावपूर्ण सन्मान करण्यात आला. या वेळी भारताचार्य पू.(प्रा.) सु.ग. शेवडे आणि सनातनच्या संत पू. (सौ.) ज्योति ढवळीकर उपस्थित होत्या.

या वेळी मार्गदर्शन करतांना जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांनी सांगितले की , हिंदु धर्मीयांनी सर्व भेद विसरून एकत्र येणे आवश्यक आहे. आमचे आणि प.पू. डॉ. आठवले यांचे मिशन एकच आहे, ते म्हणजे हिंदु धर्माचे रक्षण आणि उत्थान! समाजाच्या कल्याणासाठी सात्त्विक शक्तींचे एकत्रीकरण होणे, ही आजच्या काळाची सर्वांत मोठी आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. प.पू. डॉ. आठवले हे अंतर्बाह्य सत्पुरुष असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सनातनचे साधक जगभरात विश्वशांतीचे असामान्य कार्य करत आहेत. हे कार्य इतर कोणत्याही संप्रदायाला सहजासहजी शक्य झालेले नाही, कारण येथे गुरुतत्त्व प्रधान मानले जाते आणि शिस्तबद्ध पद्धतीने साधना केली जाते, असे गौरवोद्गार महाराजांनी काढले.

या वेळी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य पुढे म्हणाले की, कलियुगात रज आणि तम या गुणांचा प्रभाव आपोआप वाढतो; त्यासाठी कोणत्याही निमंत्रणाची गरज नसते. हे गुण मानवी जीवनाला अधोगतीकडे नेतात. या गुणांचा प्रभाव नष्ट करून सात्त्विकता वाढवण्यासाठी समाजाने 'साधना' करणे अनिवार्य आहे. संतांच्या सान्निध्यातील सात्त्विक स्पंदने मनवाला आत्मचैतन्याकडे घेऊन जातात. सनातन आश्रमातील साधक ज्या प्रकारे स्वतःच्या चुका लिहतात आणि आत्मचिंतन करतात, त्या पद्धतीचा महाराजांनी विशेष गौरव केला. जर समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःचे दोष शोधून ते दूर करण्याचा प्रयत्न केला, तरच एक निर्दोष आणि सुसंस्कृत समाज घडेल, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

# विद्यार्थी गिरवणार लैंगिक शिक्षणाचे धडे, केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात माहिती

नवी दिल्ली, दि. १५ (वृत्तसंस्था) – शाळांमध्ये सर्वसमावेशक लैंगिक शिक्षण अभ्यासक्रमाचा अनिवार्य भाग करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या एका महत्त्वाच्या सुनावणीदरम्यान केंद्राने याबाबत माहिती दिली. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी २६ सदस्यीय राष्ट्रीय तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने आपला अहवाल सरकारकडे सादर केला असून सर्वोच्च न्यायालयाची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर नव्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी केली जाईल.

१५ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरांच्या गोपनीयतेच्या अधिकाराशी संबंधित प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून (सु मोटो) दखल घेतली होती. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. किशोरवयीन मुला–मुलींमधील परस्पर संमतीने निर्माण झालेल्या संबंधांना विचार न करता पॉक्सो कायद्याअंतर्गत गंभीर गुन्हा ठरवले जात असल्याबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती. याच पार्श्वभूमीवर शाळांमध्ये लैंगिक शिक्षणाबाबत केंद्र सरकारकडून माहिती मागवण्यात आली होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर केंद्र सरकारने महिला व बालविकास मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली २६ सदस्यीय राष्ट्रीय तज्ज्ञ समिती स्थापन केली. या समितीत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मधील तज्ज्ञ, क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ आणि विविध मंत्रालयांचे प्रतिनिधी सहभागी होते. समितीला पॉक्सो कायद्याशी संबंधित प्रकरणांमध्ये किशोरांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी व्यवहार्य आराखडा तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

**किशोरांचे गुन्हेगारीकरण थांबवण्यावर भर**

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की, १५ ते १८ वर्षे हा शारीरिक आणि मानसिक बदलांचा महत्त्वाचा टप्पा असतो. पॉक्सो कायदा मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण देण्यासाठी करण्यात आला असला तरी अनेक प्रकरणांमध्ये परस्पर संमतीने असलेल्या किशोरवयीन प्रेमसंबंधांवरही या कायद्याचा वापर केला जात आहे. १६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलगा आणि मुलगी घरातून पळून जाऊन विवाह करतात किंवा संबंध ठेवतात, तेव्हा अनेकदा कुटुंबीय तथाकथित कौटुंबिक सन्मानाच्या नावाखाली मुलाविरुद्ध पॉक्सोचा गुन्हा दाखल करतात, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलांना तुरुंगात जावे लागते आणि त्यांचे शिक्षण व भवितव्य धोक्यात येते. अशा घटना टाळण्यासाठी योग्य वयात योग्य शिक्षण देणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले.

**न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर अंमलबजावणी**

सर्वोच्च न्यायालयाने या अहवालाचा सविस्तर अभ्यास करून पुढील आदेश देणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की, अल्पवयीन मुलांना कठोर पॉक्सो कायद्याच्या अनावश्यक कारवाईपासून वाचवणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रकरणात पोलिस हस्तक्षेप हा उपाय असू शकत नाही. त्यामुळे जागरूकता आणि योग्य शिक्षण हाच सर्वात प्रभावी मार्ग असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

# पाण्यात उतरणारे विमान आणले, आता हवेत उडणारी बस आणणार - नितीन गडकरी

नवी दिल्ली, दि. १५ (वृत्तसंस्था) – केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज ६३ किलोमीटर लांबीच्या कानपूर–लखनौ एक्सप्रेसवेचे उद्घाटन केले. या उद्घाटनप्रसंगी भाषण करताना गडकरींनी भविष्यातील वाहतूक तंत्रज्ञानाविषयी मोठी घोषणा केली. 'मी आगामी काळात अनेक नवीन तंत्रज्ञाने आणणार आहे. याआधी मी रोप–वे आणि केबल कार आणली. तसेच पाण्यात उतरणारे विमानही आणले होते, जे समुद्रात उतरले होते. आता मी लवकरच हवेत उडणारी बस आणणार आहे,' असे गडकरी म्हणाले. एका वृत्तवाहिनीने यासंदर्भात वृत्त दिले आहे.

ते म्हणाले की, यासाठी इलेक्ट्रिसिटीवर चालणारी मास रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टीम तयार करत आहे. ज्यामुळे प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी इतक्या वेगाने पोहोचता येईल की, त्यांना प्रवासाचा वेळही जाणवणार नाही. त्यांचे हे वक्तव्य सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

दरम्यान, नुकतेच उद्घाटन करण्यात आलेला कानपूर–लखनौ एक्सप्रेसवेवर वाहनांसाठी कमाल वेग मर्यादा १२० किमी प्रतितास निश्चित करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने या मार्गावर दुचाकींना प्रवेश बंदी असून केवळ चारचाकी आणि मोठ्या वाहनांनाच प्रवासाची परवानगी असणार आहे. उद्घाटनानंतर गडकरी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्वतः कारने उन्नाव ते लखनौच्या सरोजनी नगरपर्यंत प्रवास करत या नव्या रस्त्याची चाचणी देखील घेतली. गडकरी म्हणाले की, ई२० इंधन बाजारात आणण्यापूर्वी त्याची योग्य चाचणी करण्यात आली होती. मायलेजबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, दिल्ली किंवा मुंबईसारख्या शहरांतील वाहतुकीत फारसा फरक जाणवणार नाही. मात्र, दिल्ली–मुंबई द्रुतगती महामार्गासारख्या ठिकाणी जास्त वेगाने वाहन चालवल्यास मायलेजमध्ये थोडी घट होऊ शकते.

# १०० टक्के शुद्ध पेट्रोल हवं असेल तर अधिक पैसे मोजावे लागतील - नितीन गडकरी

नवी दिल्ली, दि. १५ (वृत्तसंस्था) – पेट्रोलमध्ये सध्या २० टक्के इथेनॉल मिसळून त्याची विक्री केली जात आहे. पण यामुळे गाड्या खराब होत असल्याची तक्रार सामान्य लोकांनी केली आहे. पण १०० टक्के शुद्ध पेट्रोल हवं असेल तर अधिक पैसे मोजावे लागतील असे विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे.

देशभरात इथेनॉलवरून रणकंदन सुरू आहे. इथेनॉलमुळे गाड्यांचे मायलेज कमी झाल्याचे तसेच गाड्या खराब झाल्याची तक्रार होत आहे. असे असले तरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इथेनॉलमुळे असे काही होत नसल्याचा दावा केला आहे.

इतकेच नाही तर आपल्याविरोधात पैसे देऊन हा अपप्रचार केल्याचा आरोपही गडकरी यांनी केला आहे. आता टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, ई२० इंधनाविरोधातील मोहीम ही राजकीय हेतूने चालवली जात आहे.

काही लोक मला आणि सरकारला लक्ष्य करत आहेत. तसेच ई२० इंधनामुळे वाहनांच्या इंजिनचे नुकसान होते, अशी चुकीची माहिती पसरवली जात आहे. मात्र, ई १० साठी तयार करण्यात आलेली सर्व वाहने ई२० इंधनावर कोणतीही अडचण न येता चालू शकतात. आतापर्यंत इंजिन खराब झाल्याची एकही तक्रार आलेली नाही, असा दावा त्यांनी वृत्तपत्राशी बोलताना केला.

**मायलेजमध्ये थोडी घट होऊ शकते! गडकरींची कबुली**

गडकरी म्हणाले की, ई२० इंधन बाजारात आणण्यापूर्वी त्याची योग्य चाचणी करण्यात आली होती. मायलेजबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, दिल्ली किंवा मुंबईसारख्या शहरांतील वाहतुकीत फारसा फरक जाणवणार नाही. मात्र, दिल्ली–मुंबई द्रुतगती महामार्गासारख्या ठिकाणी जास्त वेगाने वाहन चालवल्यास मायलेजमध्ये थोडी घट होऊ शकते.

# पालक अधिकारी अश्विनी लाठकर यांनी घेतला विविध योजनांचा आढावा



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील ग्रामपंचायती मध्ये शासकीय योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभाग प्रमुखांना तालुक्याचे पालकत्व देण्यात आलेले आहे

पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर १४ जुलै २०२६ रोजी मासिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये आणि पालक अधिकारी अश्विनी लाठकर(शिक्षण अधिकारी माध्यमिक व प्राथमिक ) यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पंचायत समितीच्या सभागृहात सकाळी आयोजित करण्यात आली होती पंचायत समितीचे सभापती कल्याण गायकवाड यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले बैठकीला पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शिवाजी साळुंके , गट शिक्षणाधिकारी चेतन कांबळे , तालुक्याचे सर्व कार्यालय प्रमुख, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामविकास अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विविध शासकीय योजनांचा सखोल आढावा :** या मासिक बैठकीमध्ये प्रामुख्याने घरकुल योजना (पंतप्रधान आवास, रमाई, शबरी, मोदी आवास इ.) आणि मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) अंतर्गत सुरू असलेल्या कामांवर विशेष भर देण्यात आला. यासोबतच खालील प्रमुख विषयांचा सखोल आढावा घेण्यात आला. पंचायत व लेखा विभाग: CSMRDA क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, ग्रामपंचायतींची सन २०२६–२७ ची कर आकारणी व डिमांड बिले बजावणे, वार्षिक प्रशासन अहवाल (२०२५–२६) आणि लेखापरीक्षण पूर्तता अहवाल सादर करणे.

- आपले सरकार सेवा केंद्र: ३३ नमुने ऑनलाइन अद्ययावत करणे, प्रलंबित तक्रारींचे निवारण आणि ग्राम सुरक्षा कार्यन्वयन.
- विकास व बांधकाम: अल्पसंख्याक निधी, जनसुविधा व लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या विकास कामांची विहीत मुदतीत पूर्तता करणे.
- मनरेगा व कृषी विभाग: जॉब कार्ड ई–केवायसी (शघधउ) प्रक्रिया, मजुरांचे ॲप्स नोंदणी, आगामी ग्रामसभेतून सन २०२७–२८ चा आराखडा मंजूर करणे आणि कृषी–पशुसंवर्धन योजनांचा आढावा.
- स्वच्छ भारत व पाणी पुरवठा: घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, जल जीवन मिशन अंतर्गत कामांची प्रगती आणि पाणी टंचाई कृती आराखडा.
- इतर विभाग: आरोग्य (जन्म–मृत्यू नोंदी), महिला व बालविकास, समाज कल्याण आणि उमेद (छठङच) अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती तपासण्यात आली. पालक अधिकारी अश्विनी लाठकर यांनी या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील विकास कामांची गती वाढवण्याच्या दृष्टीने आणि शासकीय योजनांची उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याबाबत सर्व उपस्थित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या. संपूर्ण राज्यात छत्रपती संभाजीनगर तालुका विविध योजनांच्या व विकास कामांच्या बाबतीत जिल्ह्यात क्रमांक एक वर राहण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत यासाठी प्रोत्साहन दिले.

# आलिया भट्टची 'तुंबाड २'मध्ये एंट्री; सोहम शाह आणि नवाझुद्दीन सिद्दीकींसोबत पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार

नवाझुद्दीन सिद्दीकी यांच्या बहुचर्चित एन्ट्रीनंतर आता 'तुंबाड २'ने आणखी एका मोठ्या कलाकाराच्या नावाची घोषणा केली आहे. आलिया भट्ट अधिकृतपणे या बहुप्रतीक्षित सिक्वेलमध्ये एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार असून, अलीकडच्या काळातील भारतीय सिनेमातील ही सर्वात महत्त्वाच्या सहकार्यांपैकी एक मानली जात आहे.

'तुंबाड' हा भारतीय सिनेमातील एक असा दुर्मीळ चित्रपट आहे, ज्याने लोककथा आणि फँटसी या प्रकाराला एक नवी ओळख दिली. आपल्या समृद्ध विश्वनिर्मिती, वातावरणनिर्मिती, प्रभावी कथनशैली आणि भव्य दृश्यरचनेमुळे या चित्रपटाने प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले आहे. वर्षानुवर्षे त्याची लोकप्रियता वाढतच गेली असून, त्याच्या पुनर्प्रदर्शनाने भारतीय सिनेमातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या री–रिलीज चित्रपटाचा विक्रमही केला. त्यामुळे 'तुंबाड' आधुनिक भारतीय सिनेमातील सर्वाधिक प्रतिष्ठित क्लासिक चित्रपटांपैकी एक ठरला आहे.

आता 'तुंबाड २' हे विश्व आणखी भव्य स्वरूपात प्रेक्षकांसमोर येणार आहे. नवाझुद्दीन सिद्दीकी यांच्या सहभागानंतर आता आलिया भट्टची एन्ट्री या चित्रपटाच्या भव्यतेला आणि सर्जनशील महत्त्वाकांक्षेला आणखी अधोरेखित करते. भारतीय सिनेमातील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक असलेल्या आलियाची या वैशिष्ट्यपूर्ण आणि बहुप्रतीक्षित सिनेमॅटिक विश्वात झालेली एन्ट्री प्रेक्षकांसाठी मोठे आकर्षण ठरणार आहे.

विविध प्रकारच्या भूमिका समर्थपणे साकारण्याच्या क्षमतेसाठी आणि धाडसी भूमिकांच्या निवडीसाठी ओळखली जाणारी आलिया भट्ट 'तुंबाड २'साठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. व्यक्तिरेखाप्रधान चित्रपटांपासून ते भव्य सिनेमॅटिक अनुभवांपर्यंत सहज वावरणाऱ्या आलियाने स्वतःला आपल्या पिढीतील सर्वाधिक प्रभावी अभिनेत्रींपैकी एक म्हणून सिद्ध केले आहे. 'तुंबाड' फ्रँचायझीमागील प्रमुख सर्जनशील शक्ती असलेले अभिनेता–निर्माते सोहम शाह आणि दमदार अभिनयासाठी प्रसिद्ध नवाझुद्दीन सिद्दीकी यांच्यासोबतची तिची ही पहिलीच जुगलबंदी या विश्वाला एका नव्या पर्वात घेऊन जाणार आहे. या तिन्ही कलाकारांच्या एकत्र येण्याने 'तुंबाड'च्या विश्वात तीन वेगवेगळ्या सर्जनशील दृष्टिकोनांची भर पडणार आहे. सोहम शाह यांनी उभारलेले हे विश्व, नवाझुद्दीन सिद्दीकी यांची प्रभावी अभिनयशैली आणि आलिया भट्टची महत्त्वपूर्ण नवी भूमिका यामुळे 'तुंबाड २'मध्ये एक वेगळीच रंगत निर्माण होणार असून, मूळ चित्रपटाचा आत्माही कायम राखला जाणार आहे. आलिया भट्ट म्हणाली, ''तुंबाड' मी पहिल्यांदा पाहिल्यापासून तो माझ्या मनात कायम आहे. इतकं वेगळं, समृद्ध आणि प्रेक्षकांना पूर्णपणे त्या विश्वात घेऊन जाणारं जग फारच कमी चित्रपट निर्माण करू शकतात.



त्याहूनही कमी चित्रपट असे असतात, जे प्रदर्शित झाल्यानंतर अनेक वर्षांनीही लोकांच्या कल्पनाशक्तीत जिवंत राहतात. हाच या संधीचा सर्वात मोठा आनंद आहे. आता त्या विश्वाचा भाग होणं माझ्यासाठी खूप खास आहे. सोहम आणि नवाझ या दोन्ही कलाकारांसोबत काम करण्याची मी अनेक वर्षांपासून इच्छा बाळगली होती. या समृद्ध, गूढ आणि अविस्मरणीय कथेतल्या एका महत्त्वाच्या व्यक्तिरेखेचा शोध घेण्याची संधी मला मिळत आहे, याचा मला खूप आनंद आहे. आम्ही एकत्र काय निर्माण करत आहोत, ते प्रेक्षकांनी अनुभवावं यासाठी मी आतुर आहे.'

सोहम शाह म्हणाले, 'आलिया भट्टचं 'तुंबाड २'मध्ये स्वागत करताना आम्हा सर्वांना अतिशय आनंद होत आहे. ती या पिढीतील सर्वाधिक प्रतिभावान अभिनेत्रींपैकी एक आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना तिचा एक पूर्णपणे वेगळा आणि अनोखा अवतार पाहायला मिळेल, याची मला खात्री आहे. पदार्पणापासूनच तिने सातत्याने अप्रतिम अभिनय केला आहे. तिच्यासोबतची ही माझी पहिलीच जुगलबंदी असून, तिच्यासोबत काम करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे.

निर्माते डॉ. जयंतीलाल गडा म्हणाले, आलिया भट्ट ही आपल्या इंडस्ट्रीतील सर्वोत्तम अभिनेत्रींपैकी एक आहे आणि तिची 'तुंबाड २'मध्ये झालेली एन्ट्री आमच्यासाठी खरोखरच खास आहे. 'गंगूबाई काठियावाडी' आणि 'आरआरआर'च्या अभूतपूर्व यशानंतर आलियासोबतचा हा आमचा तिसरा प्रोजेक्ट असल्यामुळे ही भागीदारी आणखी विशेष ठरते. या चित्रपटासाठी ती सर्वोत्तम निवड आहे आणि प्रेक्षकांना तिचा यापूर्वी कधीही न पाहिलेला अवतार अनुभवायला मिळेल. ती अत्यंत कुशल अभिनेत्री असून, या प्रकल्पामागील आमची महत्त्वाकांक्षा तिने लगेच समजून घेतली. तिच्या सहभागामुळे चित्रपटाची उंची निश्चितच अधिक वाढेल.

'तुंबाड २'ची निर्मिती अभिनेता–निर्माते सोहम शाह त्यांच्या Sohum Shah Films या बॅनरअंतर्गत करत असून, Pen Studiosचे प्रमुख आणि ज्येष्ठ निर्माते डॉ. जयंतीलाल गडा यांचीही या प्रकल्पात भागीदारी आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन आदेश प्रसाद करत असून, ते 'तुंबाड 'च्या विश्वातील या बहुप्रतीक्षित पुढील अध्यायाला आकार देत आहेत. 'आरआरआर' आणि 'गंगूबाई काठियावाडी'सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांना पाठबळ देणाऱ्या झशप डींवळी च्या सहकार्याने हा चित्रपट भव्य सिनेमॅटिक स्वरूपात साकारला जात आहे. 'तुंबाड २' ३ डिसेंबर २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# योजना पूर्ण करून शहरवासीयांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजना आढावा बैठक

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर वासियांना पुरेपूर पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. या योजनेचे काम गतीने पूर्ण करून शहरवासीयांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी याबाबत आयोजित बैठकीत दिले.

बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, आमदार सतीश चव्हाण, माजी खासदार डॉ. भागवत कराड उपस्थित होते तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी बैठकीत सहभाग घेतला.

कंत्राटदाराने व संबंधित यंत्रणांनी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी टप्पे पाडण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, योजनेची अर्धवट झालेली कामे कंत्राटदाराकरवी तातडीने पूर्ण करून घ्यावीत. पाण्याच्या टाकीची बांधकामे पूर्ण करण्यात यावीत. शहरातील वितरण प्रणालीचे कामही पूर्णत्वास न्यावे. अर्धवट कामांमुळे शहरवासीयांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करता येत नाही. या योजनेच्या कामासाठी संबंधित विभागाने स्थळ पाहणी करून सद्यस्थितीबाबत कंत्राटदारासोबत स्वतंत्र बैठक घ्यावी.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कुठल्याही परिस्थितीत योजनेचे काम विहित कालावधीत पूर्ण करावे. शेवटच्या शहरवासीयाला नियमित व शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यानुसार महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करून योजना पूर्णत्वास न्यावी. शहरातील नळ जोडण्या देण्याचे प्रमाण वाढवावे. कंत्राटदाराच्या कामाचे मूल्यांकन करून वेळोवेळी कामाचा आढावा घ्यावा. संबंधित कंत्राटदाराकडून पाणीपुरवठा वितरण प्रणालीचे 'हायड्रोलिक टेस्टिंग' पूर्ण करावे.




कंत्राटदाराने योजनेचे विहित कालावधीत काम पूर्ण करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. योजनेच्या कामाचे नियोजित टप्पेनिहाय आराखडा बनवून याबाबत पुढील बैठकीत सादरीकरण करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. जुन्या पाणीपुरवठा वितरण प्रणालीच्या रेस्टोरेशनचे कार्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करावे. रिस्टोरेशनचे कार्य गतीने पूर्ण करून खोदलेले रस्ते आणि खड्ड्यांची दुरुस्ती करावी. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शहरात कुठेही खड्ड्यांमुळे अपघात होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

बैठकीत पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव पराग जैन यांनी सादरीकरण केले. बैठकीस संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती अध्यक्ष अनिल मकरिये, अपर मुख्य सचिव (नगर विकास) के. गोविंदराज, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव नायक, महापालिका आयुक्त अमोल येडगे, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण महानगर आयुक्त जी. श्रीकांत आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे छत्रपती संभाजी नगर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी बैठकीत सहभाग घेतला.

### थोडक्यात पाणीपुरवठा योजना

छत्रपती संभाजी नगर शहराच्या २०५२ मध्ये असणाऱ्या लोकसंख्येला ६०४ एमएलडी (मिलियन लिटर पर डे) एवढा पाणीपुरवठा गृहीत धरून जायकवाडी प्रकल्पावरून पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. पाणी वितरणासाठी शहरात ५९ पाण्याच्या टाक्या बांधण्यात येणार त्यापैकी २९ पाण्याच्या टाक्या पूर्ण झाल्या आहेत. शहरात १९११ किलोमीटर पाणी पुरवठा वितरण प्रणालीपैकी १२९१ किलोमीटर पाईपलाईनचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच ४६ हजार ५०० नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत.

# रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगरचा पदग्रहण सोहळा दिमाखात साजरा; अध्यक्षपदी रो सीए मुकुंद पागे

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजी नगरचा ७४ वा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी माजी प्रांतपाल डॉ राजीव प्रधान, तर प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री चैत्राम जी पवार व सहाय्यक प्रांतपाल रो दीपक बागडिया हे उपस्थित होते. मावळते अध्यक्ष रो. अनय फणसळकर यांनी आपला अध्यक्षपदाचा पदभार रो सीए मुकुंद पागे यांच्या कडे सुपूर्द केला. नूतन सचिव पदी रो पंकज लोया यांनी तर कोषाध्यक्षपदी रो दीपाली सेवालीकर यांनी पदभार स्वीकारला. कार्यक्रमाची सुरुवात रो. अक्षता मुळे यांच्या इशस्तवनाने झाली. त्यानंतर रोटरी चे संस्थापक रो. पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेस नमन करून, प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मोगऱ्याच्या रोपास जल अर्पण करण्यात आले.




या प्रसंगी दी रोटरी फाउंडेशन ला भरभरून देणगी देणाऱ्या क्लब मधील सदस्यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पूर्व अध्यक्ष रो अनय फणसळकर यांनी आपल्या मनोगतात मागील वर्षभरातील कामगिरीचा आढावा सादर केला. नूतन अध्यक्ष रो सीए मुकुंद पागे यांनी आगामी वर्षात आपण सर्व मोठे प्रोजेक्ट्स करण्यावर भर देणार आहोत असे सांगितले. त्याबरोबरच त्यांनी ह्या वर्षीची आपल्या संचालक मंडळांची नावे जाहीर केली. यामध्ये काही जुन्या सदस्यां बरोबरच नवीन सदस्यांना सुद्धा समाविष्ट करण्यात आले. नवीन संचालक मंडळात रो सुरज डुमणे, रो. अमित वैद्य,रो सरिता लोणीकर, रो विजय जैस्वाल, रो विनायक उपाध्ये, रो मिलिंद सेवलीकर आणि रो चैतन्य धारूरकर हे जुने सदस्य तसेच नवीन सदस्यां मध्ये रो. डॉ मनोज डोरलीकर, रो सागर गडप्पा,रो उमाकांत तीळकरी व रो आनंद कांबळे यांचा समावेश करण्यात आला. यानंतर सहाय्यक प्रांतपाल रो दीपक बागडिया यांनी प्रांतपाल रो जयेशजी पटेल यांचा संदेश वाचून दाखवला.

पीडीजी डॉ राजीव प्रधान यांनी आपल्या भाषणात, कामाप्रती असलेली कटिबद्धता म्हणजेच Commitment To Work हा महत्वाचा मुद्दा अनेक उदाहरणासहित सांगितला. रोटरी मध्ये हे बीज रुजवले तर रोटरी खूप काही करू शकते, असेही ते म्हणाले.

पद्मश्री चैत्राम पवार यांनी सांगितले की, आधी त्यांचे बारीपाडा हे गाव व्यसनाधीन होते, ते गाव पूर्ण पणे व्यसन मुक्त करून, त्या सर्वांना सहभागी करून गावाचा सर्वांगीण विकास केला. साधी रहाणी उच्च विचार सरणी हे त्यांच्या व्यक्तिमत्वात जाणवते. त्यांनी युद्धजन्य परिस्थिती मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला साद देत गॅस सिलिंडर न वापरण्याचा सर्वानुमते निर्धार केला.

पीडीजी रो डॉ राजीव प्रधान यांचा परिचय रो सुरज डुमणे यांनी, तर श्री चैत्राम जी पवार यांचा परिचय रो आनंद कांबळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रांतपाल रो. अमित कोरडे यांनी केले. राष्ट्रगीता नंतर या कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास माजी प्रांतपाल डॉ. प्रफुल्ल मिरजगावकर, रो.सतीश लोणीकर (प्रांतपाल २०२८-२९) तसेच रो रुक्मेश जखोटिया यांनी हजेरी लावली. तसेच शहरातील ज्येष्ठ रोटरियन, इतर क्लबचे अध्यक्ष, सचिव तसेच सदस्य उपस्थित होते.

# महावितरण कर्मचाऱ्यांना मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- एरिअल बंच केबलचे काम करणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गेवराई गावातील दोन जणांवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

महावितरणच्या वाळूज महानगर ग्रामीण शाखेचे वरिष्ठ तंत्रज्ञ संजय चव्हाण व त्यांचे सहकारी तंत्रज्ञ जितेंद्र राठोड, वरिष्ठ तंत्रज्ञ योगेश कणके छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील गेवराई गावात एरियल बंच केबलचे काम करण्यासाठी मंगळवारी (१४ जुलै) सकाळी ११ वाजेच्या सुमारास गेले होते. त्यावेळी त्यांनी पाडळकर डीपी, बगडीया डीपी, दर्डा डीपी या तिन्ही रोहित्रांचा विद्युतपुरवठा खंडित करून केबल चे काम सुरू केले. दुपारी १.३० वाजेच्या सुमारास उत्तम बाबू चव्हाण याच्या घरासमोरील विद्युत तारांचे काम सुरू होते. त्यावेळी उत्तम चव्हाण याने जितेंद्र राठोड यांना शिविगाळ करत धक्काबुक्की केली. त्यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी ते काम तसेच ठेवून दुपारी ३.३० ते ४ वाजेदरम्यान गेवराई गावातील मुख्य रस्त्यावरील विद्युत ताराचे काम केले. त्यावेळी गावातील सतीश विष्णू शिंदे हा तिथे आला. 'लाईट का बंद केली, लाईट बंद करायचे तू परमिशन घेतले आहे का, काम बंद करा, काम करायचे नाही'. असे म्हणत सतीश शिंदेने महावितरणच्या कर्मचाऱ्यांना अर्वाच्य शिविगाळ केली. जितेंद्र राठोड यांच्या शर्टाची कॉलर धरून त्याच्या खांद्यावरील बक्कलचे बटन तोडले तसेच योगेश कणके यांनाही शिंदेने शिविगाळ केली.

घटनेनंतर वरिष्ठ तंत्रज्ञ संजय चव्हाण यांनी चिकलठाणा पोलिस ठाणे गाठून रीतसर फिर्याद दिली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी

सतीश विष्णू शिंदे व उत्तम बाबू चव्हाण या दोघांवर मंगळवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला.

# मनपा एन-११ शाळेत स्वच्छता जनजागृती कार्यक्रम

## मनपा व राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातर्फे स्वच्छता पंधरवाडा साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (एन एस ओ) क्षेत्रीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने १ जुलै ते १५ जुलै दरम्यान 'स्वच्छता पंधरवाडा' राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा भाग म्हणून, बुधवार (दिनांक १५ जुलै) रोजी उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली झोन क्रमांक ४, प्रभाग क्रमांक २ मधील मनपा प्रशाला, एन-११ (सौभाग्य चौक, सिडको) येथे स्वच्छता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या जनजागृती कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध लेखन, 'बेस्ट फ्रॉम वेस्ट' (टाकाऊतून टिकाऊ) आणि प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे भाग घेतला. स्पर्धा संपल्यानंतर सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक राजगौरव वानखेडे, किशोर नागरे, उल्हास पाटील आणि राहुल रोजतकर उपस्थित होते. या प्रसंगी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय क्षेत्रीय कार्यालयाचे संचालक जयप्रकाश होनराव, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी तथा कार्यालय प्रमुख मुकेश बाबू, रमाकांत, संगीता निकम, ताजखान पठाण, अविनाश कांबळे, गर्जना गवारे आणि प्रतिमा वाखारे आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षक श्रीमती रेणुका गायकवाड यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन केले. सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेऊन घर, शाळा, परिसर आणि शहर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार केला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनपा प्रशालेचे मुख्याध्यापक किशोर दांडगे, समन्वयक अश्विनी हिवर्डे, रोहिणी रोकडे, शीतल गोरे, समीक्षा शहाणे, मनीषा पगडे आणि अश्विनी जयस्वाल यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'इंडिया स्किल्स स्पर्धेत' युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७'चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींनी मोठ्या संख्येने नोंदणी करून आपल्या कौशल्याला जागतिक व्यासपीठ मिळवून द्यावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त राजू वाकुडे यांनी केले आहे.

भारत सरकारच्या 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट काऊन्सिल'च्या मार्गदर्शनाखाली होणारी ही देशातील सर्वात प्रतिष्ठित कौशल्य स्पर्धा आहे. या स्पर्धेतून निवडलेले तरुण जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरील विजेत्यांना थेट जागतिक स्तरावरील 'वर्ल्ड स्किल्स कॉम्पिटिशन'मध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उमेदवार भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे.

सामान्य कौशल्य प्रकार ५६ असून उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असावा.टीम कौशल्य प्रकार मध्ये (रोबोटिक्स, कन्स्ट्रक्शन इ. मध्ये सहभागी होणाऱ्या उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतर असावा. यात ऑटोनॉमस मोबाईल रोबोटिक्स मेकॅट्रोनिक्स, रोबोटिक्स सिस्टिम्स इंटिग्रेशन लँडस्केप गार्डनिंग याचा समावेश आहे.

इच्छुक उमेदवारांनी अर्ज अधिकृत संकेतस्थळ www. skillindiadigital.gov.in वर जाऊन 'User Manual' आणि 'List of Skills' यांचा अभ्यास करावा. आयटीआय, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन, विविध कौशल्य प्रशिक्षण संस्था आणि उद्योगांमधील कुशल तरुणांनी या स्पर्धेत सहभागी होऊन जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मालजीपुरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ९४०४६७४८५९ या व्हॉट्सॲप क्रमांकावर संदेश पाठवावा, सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे

# जोहरीवाडा येथील श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन जिनालयात अभिषेक भक्तिभावाने संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जोहरीवाडा येथील श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन जिनालयात आयोजित अड्ढाहर अभिषेकाचा पवित्र व मंगलमय सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि धार्मिक उत्साहात संपन्न झाला यावेळेस चातुर्मासासाठी विरामान पू. सा. अर्केंदुश्रीजी म. सा., विदुषी पू. सा. राजप्रज्ञाश्रीजी म. सा., पू. सा. कोटिगुणाश्रीजी म. सा. तसेच पू. सा. भव्यरत्नाश्रीजी म. सा. आदी ठाणा-६ यांची उपस्थित होती या निमित्ताने जैन समाजात आनंदाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

तीर्थंकर परमात्म्यांचा अभिषेक व पूजन हे आत्मशुद्धी, सम्यक्त्वाची दृढता आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. हा भव्य धार्मिक विधी श्री. अनिलभाई गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सौ. काश्मीराबेन विनोदभाई लोडाया यांच्या शुभहस्ते विधिवत संपन्न झाला. या पुण्यप्रसंगी लाभार्थी कुटुंबावर जैन समाजाकडून अभिनंदनाचा आणि अनुमोदनेचा वर्षाव करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांनी भगवान श्री गोडीजी पार्श्वनाथ यांच्या चरणी सर्वांच्या सुख, शांती, आरोग्य, समृद्धी आणि धर्मभावनेत सतत वृद्धी होण्यासाठी प्रार्थना केली.

या भक्तिमय आणि प्रेरणादायी धार्मिक अनुष्ठानामुळे समाजात सकारात्मक ऊर्जा, धर्मप्रभावना आणि आध्यात्मिक संस्कार अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या पुण्यप्रसंगी लाभार्थी परिवाराचे तसेच सकल जैन समाजाचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

# सातारा परिसरातील नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमण हटवले

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील सातारा परिसर, गट क्रमांक ४ येथील नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमण हटवण्यात आले आहे. अनिल सांगवी आणि अनिल संचेती यांनी सिमेंटचे पाईप टाकून आणि कंपाऊंड बांधून हा नाला पूर्णपणे बुजवला होता. या अतिक्रमणामुळे नाल्याचा नैसर्गिक प्रवाह वळवून सुमारे १२०० मिमीचे पाईप टाकून नाला एका बाजूने प्रवाहित करण्यात आला होता. या अनधिकृत बांधकामामुळे पावसाळ्यात पाणी तुंबून परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता होती.

या बांधकामाबाबत अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांनी सुनावणी घेतली असता, महानगरपालिकेची कोणतीही वैध परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने हे सर्व अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले.

संबंधित व्यक्तींवर सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, कारवाईसाठी लागलेला मनुष्यबळ व मशिनरीचा खर्च त्यांच्याकडून वसूल केला जाईल. या कारवाईदरम्यान नाल्यात टाकण्यात आलेले सिमेंटचे ६३ पाईप जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आले. तसेच चारही बाजूचे कंपाऊंड जमीनदोस्त करून नाल्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्यात आला.



आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार, अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहूळे, उपायुक्त सविता सोनवणे आणि सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

(पान १ वरुन)

## आठवडाभराच्या विश्रांतीनंतर वरुणराजा बरसला;...

दमदार पाऊस सुरू आहे. या पावसाने केज शहरातील रस्ते जलमय झाले आहेत तर काही ठिकाणी अक्षरशः गुडघाभर पाणी साचले आहे. या पावसाने परिसरातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी बीड जिल्ह्यात अद्यापही मोठ्या दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. यामुळे बळीराजाचे डोळे आभाळाकडे लागलेत.

आठवडाभराच्या विश्रांतीनंतर बदलापूर मध्ये सकाळपासूनच पावसाची रिमझिम सुरू होती. मात्र दुपारनंतर पावसाने जोर वाढवलाय. मागील तासाभरा पासून स्टेशन परिसर, कात्रप, बेलवली, वडवली, आणि पनवेल मार्गावर जोरदार पाऊस सुरू आहे. आठवडाभर विश्रांती घेतल्याने काही प्रमाणात उकाडा जाणवत होता. परंतु सध्या सुरू असलेल्या पावसाने वातावरणात पुन्हा गारवा निर्माण झालाय. तर तिकडे अंबरनाथ आणि उल्हासनगर मध्ये ढगाळ वातावरण आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून दडी मारून बसलेल्या पावसाने आज अंबाजोगाई तालुक्यात दमदार पुनरागमन केले आहे. आज दुपारी २ वाजेच्या सुमारास अचानक आकाश ढगाळून आले आणि वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे कुंबेफळसह परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, सुकण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना एकप्रकारे जीवदान मिळाले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ, वरपगाव, राडी, सातेफळ आणि कानडी परिसरात आज दुपारी वाऱ्यासह पावसाने जोरदार बॅटिंग केली आहे.

## अमेरिका-इराण यांच्यातील हल्ले-प्रतिहल्ले सुरुच

अलीकडील हल्ल्यांमध्ये २६० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मंत्रालयाचे प्रवक्ते हुसेन केरमानपूर यांनी बुधवारी ही माहिती दिली. ते म्हणाले की, जखमींमध्ये किमान तीन महिला आणि सहा मुलांचा समावेश आहे. आतापर्यंत २२२ लोकांवर उपचार करून त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. केरमानपूर म्हणाले की, हे लोक इराणवर झालेल्या अमेरिकेच्या अलीकडील हल्ल्यांमध्ये जखमी झाले आहेत. यापूर्वी बुधवारी, इराण सरकारच्या प्रवक्त्या फातिमा मोहजेरानी यांनी दावा केला होता की, दक्षिण इराणवर झालेल्या अमेरिकेच्या अलीकडील हल्ल्यांमध्ये ३० हून अधिक नागरिक ठार झाले आहेत.

## मंत्रिमंडळ विस्तारावर नव्हे विकासकामांवर चर्चा,...

शिंदे यांनी स्पष्ट केले. ही बैठक केवळ खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामांवर केंद्रित होती. कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प, रेल्वे, रस्ते आणि पंतप्रधान आवास योजनांसारख्या विविध विकासकामांचे प्रस्ताव आणि पत्रे अमित शहा यांना देण्यात आली.

दिल्लीतील विकासकामे मार्गी लावण्यासाठी समन्वय कुणाकडे असेल, यावर बोलताना शिंदे म्हणाले की, स्वतः अमित शहा यांनी शिवसेनेचे लोकसभेतील गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. जुने ७ आणि नवीन ६ अशा सर्व १३ खासदारांचे प्रश्न आणि प्रस्ताव केंद्रीय मंत्र्यांसोबत फॉलोअप करण्याचे काम आता डॉ. श्रीकांत शिंदे करतील असे शिंदे म्हणाले.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना: मुख्य अभियंत्यासह..

यांनी सोमवारी कारणे दाखवा नोटीस बजाविली होती. मंगळवार सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुलासा न केल्यास कंत्राट रद्द आणि बँक हमी जप्त करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार कंपनीने मंगळवारी खुलासा सादर केला आहे.

त्याचबरोबर महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांचा पदभार काढून त्यांनाही आयुक्तांनी कारणे दाखवा नोटीस बजावून मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दोघांनीही खुलासे सादर केले होते. दोघांचेही खुलासे असमाधानकारक, तथ्यहीन आणि शासकीय व महापालिका नियमांचे समर्थन करणारे नसल्याचे म्हटले आहे. कर्तव्यात निष्काळजीपणा, शासकीय कामात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामास अभय दिल्याचा ठपका दोघांवर ठेवण्यात आला आहे.


**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८ **मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोकहार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ **वेबसाइट:** www.truhomefinance.in

**प्रतिकात्मक ताबा सूचना**

ज्या अर्थी, खाली सही करणारे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वाश्रमीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ (सदर अधिनियम) मधील तरतुदींनुसार तसेच सदर अधिनियमाच्या कलम १३(१२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ३ अन्वये खालील तक्त्यात नमूद केलेल्या कर्जदारांना संबंधित मागणी सूचनांमध्ये नमूद केलेली थकबाकी अदा करण्यासाठी मागणी सूचना जारी केल्या होत्या.कर्जदारांनी सदर थकबाकीची रक्कम अदा करण्यात कसूर केल्यामुळे, कर्जदार तसेच सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली सही करणारे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वाश्रमीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सदर अधिनियमाच्या कलम १३(४) तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या तारण मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा (Symbolic Possession) ०९ जुलै, २०२६ रोजी घेतला आहे. याद्वारे संबंधित कर्जदार तसेच सर्वसामान्य जनतेस सावध करण्यात येते की, सदर तारण मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार झाल्यास तो खाली नमूद केलेल्या थकबाकीच्या रकमेवर तसेच त्यावरील व्याजासह ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वाश्रमीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांच्या हक्क व प्रभाराच्या अधीन राहील.कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमाच्या कलम १३ मधील पोटकलम (८) मधील तरतुदीकडे वेधण्यात येत असून, त्या तरतुदीनुसार सुरक्षित तारण मालमत्ता मुक्त करण्यासाठी (Redeem करण्यासाठी) उपलब्ध असलेल्या कालावधीची त्यांनी नोंद घ्यावी

| कर्जदाराचे नाव व पत्ता |
| --- |
| **१. श्री. निलेश भागिनाथ भालेराव (कर्जदार) २. श्री. भागिनाथ गणपत भालेराव (सह-कर्जदार) ३. सौ. सिंधुबाई भागिनाथ भालेराव (सह-कर्जदार) सर्वांचा निवासी पत्ता :गट क्र. ३५, भद्रा कॉलनी, भद्रा मारोती मंदिराजवळ, खुलताबाद, महाराष्ट्र – ४३११०१. तसेच :घर क्र. १६३, पळसगाव, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर – ४३११०१. तसेच :बॉम्बे बिल्डिंग, कन्नड–चाळीसगाव रोड, कन्नड, महाराष्ट्र – ४३११०३. तसेच :ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर – ४३११०१.** |
| **थकबाकी रक्कम** |
| मागणी सूचना दिनांक : ०९/०४/२०२६कर्ज खाते क्रमांक SHLHAURD0000874 अंतर्गत दिनांक ०७-०४-२०२६ रोजी देय असलेली रु. १०,५२,७९७/- (अक्षरी रुपये दहा लाख बावन्न हजार सातशे सत्त्याण्णव फक्त). प्रतिकात्मक ताबा दिनांक : ०९/०७/२०२६ |
| **मालमत्तेचे वर्णन** |
| मौजे पळसगाव, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथील मिळकत क्र. १६१, क्षेत्रफळ ७१४ चौ. फूट, तसेच त्यावरील सर्व बांधकाम व त्यासंबंधित सर्व हक्क व उपभोगाधिकार. चतु:सीमा :पूर्वेस : धोबी घाटपश्चिमेस : रस्तादक्षिणेस : निलेश भालेराव यांची मालमत्ता उत्तरेस : रामराव बक्रू जाधव यांची मालमत्ता |

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर
दिनांक: १५/०७/२०२६
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)